म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का-वा
ग्रं. क्र. ३२७०

IRBK-0103247
IRBK-0103247

3284

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# भक्तिमार्गदर्शक

# तुकाराम

लेखक

**शिवराम वाशीकर**

प्रभात फिल्म कंपनीच्या 'संत तुकाराम'
ह्या चित्रपटांतील बारा छायाचित्रांसह

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0103247
IRBK-0103247

प्रथमावृत्ति : १९५०

★

सर्वाधिकार सुरक्षित

★

मुद्रक

बा. ग. ढवळे,

कर्नाटक मुद्रणालय, १०३, शींव, मुंबई २२

★

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे,

श्रीसमर्थ–सदन, गिरगांव, मुंबई ४

★

छायाचित्रें व मुखपृष्ठ

'प्रभात'च्या 'संत तुकाराम'

ह्या सुप्रसिद्ध चित्रपटांतील





तुकोबांच्याच वृत्तीनें

संसार करणारे

माझे वडील बंधु

कै. एकनाथपंत ह्यांस

आदरपूर्वक अर्पण

—*शिवराम श्री. वाशीकर*

महाराष्ट्रांतील भागवत-धर्म-मंदिरावर कळस चढविणाऱ्या संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांच्या जीवनचरित्रावर पुण्याच्या प्रसिद्ध प्रभात फिल्म कंपनीनें 'संत तुकाराम' नांवाचा चित्रपट निर्माण केला आहे. त्याचीच ही कथा आहे. ही कथा पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा संकल्प सात आठ वर्षांपूर्वींच केला होता. निम्में शिम्में लेखनही झालें होतें. चित्रेंहीं झालीं होतीं. पण लेखक–प्रकाशकांच्या कांहीं अनपेक्षित अडचणींनीं हें काम इतके दिवस रेंगाळत पडलें होतें. आतां ह्या प्रकाशनाला तुकाराममहाराजांच्या **त्रिशत संवत्सरीची** संधि साधते आहे, हेंही त्यांतल्या त्यांत समाधानाचेंच आहे म्हणावयाचें. असो.

चित्रपटाच्या कथानकाचा आणि संवादांचा पूर्ण आधार घेऊन ही कथा लिहिण्यास परवानगी दिल्याबद्दल आणि कथेचें सौंदर्य वाढण्यास प्रत्यक्ष प्रसंगांचे फोटो दिल्याबद्दल मी स्वतः व प्रकाशक श्री. के. भि. ढवळे कंपनीचे फार आभारी आहोंत.

*शिवराम श्री. वाशीकर*

मुंबई, तुकारामबीज, शक १८७१

अनुक्रम २९८०६
विभाग ...
क्रमांक ७९०६
नों. दि. ३-...

# १

वाटोळी चर्या, नाकीं-डोळीं नीटस, गोलाकार दोंदिल पोट, हातांत चिपळ्या, गळ्यांत वीणा, आणि डोक्याला कुणबी पागोटें अशी मध्यम बांध्याची ठेंगणी ठुसकी पण तेजस्वी भासणारी मूर्ति काढलेलें चित्र दिसलें कीं आपण चट्‌दिशीं म्हणतों,

" हें चित्र तुकोबांचें आहे. "

तुकोबांच्या ह्या गोष्टीला आज जवळ जवळ साडेतीनशें वर्षें झालीं आहेत. पुण्याजवळ देहू म्हणून एक लहानसें गांव आहे. तेथें मोऱ्यांच्या कुळांतलें आंबिले आडनांवाचें एक घरंदाज कुटुंब नांदत होतें. तें जातीनें कुणबी होतें. तें वाण्याचा धंदा करीत असे. हें सर्वच घराणें पंढरपूरच्या विठोबाचें भक्त होतें. ह्या घराण्यांत विश्वंभरबुवा म्हणून एक पुरुष होऊन गेले. त्यांनीं तर आपल्या भक्तीच्या बळावर प्रत्यक्ष पांडुरंगाला देहूला आणिलें होतें. विश्वंभरबुवा दर पंधरा दिवसांच्या एकादशीची पंढरपूरची वारी करीत. पण पुढें म्हातारपणीं त्यांच्या हातून ती होईना आणि एकादशीच्या दिवशीं विठ्ठलाचें दर्शन घेतल्यावांचून तर त्यांना राहवेना. आपल्या दर्शनाची त्यांची खरी तळमळ पाहून प्रत्यक्ष पांडुरंगानें त्यांना एक दिवस दृष्टान्त दिला कीं,

" मीच तुझ्या गांवीं येऊन राहतों. "

आणि खरोखरीच दुसऱ्या दिवशीं देहू गांवाजवळच्या आंबेवनांत विश्वंभरबुवांना विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ति सांपडल्या. मग त्यांनीं त्या इंद्रायणी नदीच्या तीरावर आणिल्या व घराशेजारींच स्थापन केल्या. तेथें

त्यांनीं एक लहानसें देऊळ बांधलें आणि आपला राहिलला सगळा वृद्धापकाळ त्या मूर्तीच्या भजनपूजनांत घालविला.

ह्यांच्याच वंशांतले ६ वे पुरुष बोल्होबा. ह्यांच्या पोटीं आमच्या तुकोबांचा जन्म झाला.§ बोल्होबा देहू गांवचे महाजन होते. ते मोठे धर्मनिष्ठ, पापभीरु आणि पांडुरंगभक्त होते. त्यांची बायको कनकाई हीही पतिनिष्ठ व पांडुरंगभक्त होती. ते आपला परंपरागत वाण्याचा व्यापार करीत, शेतीवाडी करीत व थोडी सावकारीही करीत. प्रपंचांतले सगळे व्यवहार चोखपणानें करून मानानें व प्रतिष्ठेनें ते आपलें आयुष्य घालवीत होते. त्यांना तीन मुलें झालीं. पहिल्या मुलाचें नांव सावजी, दुसऱ्या मुलाचें नांव तुकाराम व तिसऱ्या मुलाचें नांव कान्होबा.

मुलें मोठीं झाल्यावर त्यांनीं तिघांचींही लग्नें केलीं. त्यांच्या सुनाही चांगल्या सद्गुणी होत्या. एकंदरींत बोल्होबांचा संसार सुखाचा होता. संसारदक्ष, सात्त्विक, प्रेमळ अशी बायको; कुळाची कीर्ति वाढविणाऱ्या आज्ञाधारक मुलांनीं व सुनांनीं भरलेलें घर; धन, मान आणि परमेश्वराच्या सेवेनें मनाला मिळत असलेलें खरेंखुरें समाधान; ह्या सगळ्यांनीं बोल्होबा संसारांत सुखी पुरुष होते.

होतां होतां बोल्होबांचा वृद्धापकाळ झाला, तेव्हां प्रपंचाचा भार मुलांवर टाकावा व आपण 'हरि हरि' करीत, राहिलेलें आयुष्य परमेश्वराच्या सेवेंत घालवावें असा त्यांनीं विचार ठरविला. एके दिवशीं त्यांनीं आपल्या वडील मुलाला जवळ बोलाविलें व म्हटलें,

"सावजी, आतां आम्ही दोघेंही थकलों. तूंही चांगला जाणता झाला आहेस. देणं-घेणं पाहणं, हिशेब-ठिशेब ठेवणं, किंबहुना प्रपंचांतली हरएक प्रकारची दगदग सोसण्यासारखा प्रौढही झाला आहेस. तेव्हां आतां तूं हें सगळं सांभाळ. आम्ही दोघें 'विठ्ठल विठ्ठल' करीत आयुष्याचं सार्थक करतों."

---

§ माघ वद्य ५ शक १५३०.

पण सावजीला हें पटलें नाहीं. पहिल्यापासूनच त्याचें संसारांत लक्ष नव्हतें. विश्वंभरबुवांपासून त्यांच्या घराण्यांत चालत आलेली पांडुरंगभक्ति सावजीच्या अंत:करणांत विशेष रूपानें आली होती. त्यानें प्रपंचांत गुंतून राहण्याचें साफ नाकारलें. मग राहतां राहिला तुकाराम. त्याच्यावरच संसाराचा सगळा भार पडला.

त्या वेळीं तुकाराम अवघें तेरा वर्षांचें पोर होतें. तुकोबा देखील पहिल्यापासून कांहींसे वैराग्यवृत्तीचे व वडिलांप्रमाणेंच खरे पांडुरंगभक्त होते. पण सावजीप्रमाणें त्यांत वाहवून गेले नव्हते. "आई-बाप हीं देवाचींच रूपें आहेत; मनुष्याला पावन करणारीं जगांतलीं सगळीं पवित्र तीर्थें किंवा क्षेत्रें त्यांच्याच पायांशीं सामावलीं आहेत. त्यांची आज्ञा पाळणें आणि त्यांना सुखी करणें ही एक प्रकारची परमेश्वराचीच सेवा आहे; त्याच सेवेनें, पुंडलिकानें परब्रह्मरूपी प्रत्यक्ष पांडुरंग आपल्याजवळ आणला," हें ढळढळीत उदाहरण त्यांच्या डोळ्यांपुढें होतें. म्हणून पूर्ण श्रद्धेनें त्यांनीं आईबापांची आज्ञा पाळली व संसाराची सगळी जबाबदारी अंगावर घेतली.

त्या सुमारास तुकोबांचें दुसरेंही लग्न झालें. त्यांची पहिली बायको रखमाबाई नेहमीं आजारी असे. तिला दम्याचा विकार फार दांडगा असल्यामुळें तुकोबांच्या संसारगाड्याचें हें दुसरें चाक जवळजवळ निकामी झाल्यासारखेंच होतें. म्हणून बोल्होबांनीं त्यांचें दुसरें लग्न केलें. पुण्यास आप्पाजी गुळवे नांवाचे एक सावकार होते. त्यांना आवडी नांवाची एक मुलगी होती, तिच्याशीं तुकोबांचें हें दुसरें लग्न झालें. तिचें सासरचें नांव जिजाबाई होतें. तुकोबा तिला 'आवली' म्हणत असत.

तुकोबांनीं संसार अंगावर घेतला आणि तो त्यांनीं चांगल्या तऱ्हेनें चालविला. प्रपंच नीटनेटका करण्यास अवश्य असणारें हिशेब-ठिशेब ठेवणें, खतेंपत्रें लिहिणें वगैरेंचें शिक्षण बोल्होबांनीं त्यांना दिलें होतें. सावकारी आणि शेतीवाडीचें प्रत्यक्ष ज्ञानही त्यांना झालें होतें. घरची सावकारी आणि देणें-घेणें व एक वाण्याचें दुकान असल्यामुळें त्या वेळची राजभाषा म्हणून

फारशी आणि ऊर्दूही तुकोबांना थोडीफार शिकावी लागली होती. एकंदरींत त्या वेळच्या त्यांच्यासारख्या प्रतिष्ठित आणि सुखवस्तु व्यापारी कुटुंबाचा भार व्यवहारदक्षतेनें चालविण्याचें व्यावहारिक ज्ञान तुकोबांना असल्यामुळें आई-वडिलांना पूर्ण संतोष होईल अशा तऱ्हेनें त्यांना संसार करून दाखवितां आला.

अशीं चार वर्षें गेलीं आणि तुकोबांवर संसारांतला पहिला आघात झाला. त्यांच्या वयाच्या १७ व्या वर्षीं त्यांचे वडील बोल्होबा वारले. त्यांची वडील भावजय, म्हणजे सावजीची बायकोही वारली. बायको वारल्यावर सावजीही विरक्त होऊन घर सोडून गेला. तरीही दुःखानें उदास झालेलें मन आंवरून तुकोबांनीं पुढेंही पहिल्यासारखा संसार चालविला. पण एकंदरींत ते आतां व्यवहारांत थोडे ढिलेच झाले. लोकांनींही त्यांच्या ह्या ढिलेपणाचा भरपूर फायदा घेतला. उधारी वाढली. सावकारी येणेंही येईना. त्यांना स्वतःलाच कर्ज काढावें लागलें. आणि दुःखाची पहिली जखम भरली नाहीं तोंच त्यांच्यावर पुन्हा एक मोठा कौटुंबिक आघात झाला.

पुढच्याच वर्षीं म्हणजे तुकोबांच्या वयाच्या २२ व्या वर्षीं (शक १५५२ इ. सन १६३०) पुणें प्रांतांत मोठा दुष्काळ पडला. § त्या दुष्काळांत

---

§ ह्या वर्षीं पडलेल्या दुष्काळाचें अबदुल हमीर लाहोरी ह्या मुसलमान इतिहास-कारानें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे —

“ मागील सालीं [ इ. स. १६२९ ] बालाघाटाकडे पाऊस पडला नाहीं. आणि दौलताबाद नगरच्या बाजूस तर पावसानें मुळींच टाळा दिला. ह्या वर्षी ( इ. स. १६३० ) सभोंवारच्या प्रांतांत धान्याची कमतरता झाली. **दक्षिण प्रांतांत आणि गुजरातेंत तर हाहाकार उडाला.** भाकरीच्या एका तुकड्या-साठीं लोक जनावरें व मुलेंही विकूं लागले. मुलांचीं हाडें कुटून लोक पिठांत घालूं लागले. माणसें माणसांना खाऊं लागलीं. इतकेंच काय पण लोक आपल्याच मुलांना खाऊं लागले. जिकडे तिकडे प्रेतांच्या राशी पडल्या. ” रामदासस्वामींनींही त्या दुष्काळाचें वर्णन केलें आहे. पदार्थमात्र तितुका गेला । नुसता देशचि उरला । येणें करतां बहुतांला । संकट आलें ॥ लोकें स्थानभ्रष्ट झालीं । कित्येक तेथेंचि मेलीं । उरलीतें मराया आलीं । गांवावरी ॥ – श्रीतुकारामचरित्र, पांगारकर.

तुकोबांची आई मेली. पहिली बायको रखमाबाई आणि पहिला मुलगा ( रखमाबाईचा ) संताजी दोघेंही अन्न अन्न करीत तळमळत मेलीं. व्यापार-धंद्याचेंही दिवाळें निघालें. लोकांत नापत झाली. ही सगळी संकटपरंपरा त्यांच्यावर एकदम आणि अवचित कोसळली. त्यामुळें त्यांचें अंतःकरण पिचून गेलें. ते संसाराला विटले आणि

**संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां सेवा या कुटुंबाची ।।**
**म्हणवुनी तुझे आठवले पाये । येवो माझे माये पांडुरंगे ।।**

असें विठोबाला आळवूं लागले.

दिवसेंदिवस संसाराचा त्यांचा तिटकारा वाढला आणि अंतःकरणांतला मूळचा वैराग्याचा अंकुर अधिक जोमानें तरारला. आतां त्यांनीं आपला नित्यक्रमच असा ठरविला कीं सकाळीं लवकर उठावें, आह्निक कामें उरकावींत, विठ्ठलाचें भजनपूजन करावें आणि मग देहूपासून २ मैलांवर असलेल्या भंडारा डोंगरावर जाऊन गीता, ज्ञानेश्वरी, भागवत, वगैरे ग्रंथाध्ययन करीत बसावें. तें झाल्यावर नामस्मरणांत दंग व्हावें. जेवावयाच्या वेळीं देखील कधीं घरीं यावें, कधीं न यावें; आणि घरीं आले तरी प्रापंचिक बाबतींत कसलीही चौकशी करूं नये अशी त्यांची वृत्ति झाली होती. ते म्हणत—

**बरें झालें देवा निघालें दिवाळें ।**
**बरी या दुष्काळें पीडा केली ।। १ ।।**
**अनुतापें तुझें राहिलें चिंतन ।**
**झाला हा वमन संवसार ।। २ ।।**
**बरें झालें देवा बाईल कर्कशा ।**
**बरी हे दुर्दशा जनामध्यें ।। ३ ।।**
**बरें झालें जनीं पावलों अवमान ।**
**बरें गेलें धन गुरें-ढोरें ।। ४ ।।**

**बरें झालें नाहीं धरिली लोकलाज ।**
**बरा आलों तुज शरण देवा ॥ ५ ॥**

तुकोबांचें ठीक होतें, पण जिजाईला तसें म्हणून भागण्यासारखें नव्हतें. तिला दोन मुलें होतीं, घरदार होतें, प्रपंच होता. तिला संसार करणें भागच होतें. पण संसारांतल्या कांहीं कांहीं व्यावहारिक गोष्टी पुरुषानेंच केल्याखेरीज होत नाहींत, अशा गोष्टी तिनें धैर्यानें केल्या आणि त्यांत यश आलें नाहीं किंवा तुकोबांनीं तें तिला येऊं दिलें नाहीं म्हणजे मात्र तिला संताप येई. लोकांच्या दृष्टीनें ती कर्कशा होई. आरंभीं आरंभीं उसनें-पासनें करून, उधारी करून, माहेरची थोडीफार मदत घेऊन, व्यापारा-साठीं स्वतःच्या हिंमतीवर कर्ज काढून कोसळूं पाहणारा संसार सांवरण्याचा तिनें पुष्कळ प्रयत्न केला. पण तुकोबांच्या संसारविन्मुख वृत्तीनें तिला कशांतच यश आलें नाहीं. संसारानें कावलेली ती अधिकाधिकच भांडखोर होऊं लागली. तुकोबांचा आणि त्यांना संसारांतून उठवणाऱ्या विठ्ठलाचा ती फारच राग राग करूं लागली.

तरीही तुकोबांवरील तिची भक्ति कधीं ढळली नाहीं. त्यांची तिनेंहून कधीं हेळसांड केली नाहीं. जेवायच्या वेळीं ते आले नाहींत तर ती स्वतः शिदोरी घेऊन जाई. ते असतील तेथून त्यांना ती हुडकून काढी, त्यांना जेवावयाला घाली आणि मग आपण जेवी. कधीं भांडून, कधीं तंडून, कधीं समजून सांगून, कधीं सक्तीनें, तर कधीं खुषीनें तुकोबांना संसारांत ओढण्याचा ती सारखा प्रयत्न करीतच होती. कधींकधीं त्यांत तिला यश येई. त्या वेळीं तिला अतिशय आनंद होई. कधींकधीं अपयश येई. त्या वेळीं तिला त्यांचा, विशेषतः विठ्ठलाचा अतिशय संताप येई. आतां हें सगळें तिच्या आंगवळणींच पडलें होतें.

# २

आज बरेच दिवस तुकोबांचा मुलगा महादेव आजारी होता. तरी त्याची पर्वा न करतां तुकोबांचा नित्यक्रम चालूच होता. पण जिजाईनें आज त्यांना खडसून सांगितलें होतें,

"आज मला घरांत लई काम हाये. कुट्टं भायीर जाऊं नगसा. त्या दुकन्या पोराजवळ बसा जरा."

तुकारामांनीं जिजाईचें म्हणणें ऐकिलें होतें. ते महादेवाजवळ बसले होते. त्याच्या अंगावरून हात फिरवीत मनांतल्या मनांत त्यांचें विठ्ठलनाम चाललेंच होतें. थोड्याच वेळांत महादेवाचा डोळा लागला. तेव्हां ते तेथून उठले आणि तुळशीवृंदावनाजवळ जाऊन आपल्या मनाची स्थिति पांडुरंगाला सांगूं लागले.

"पांडुरंगा, मीं कांहींही केलं तरी तुझ्या नांवाशिवाय मला आतां कशांत गोडी राहिली नाहीं."

**आणिक दुसरें मज नाहीं आतां। नेमिलिया चित्ता पासूनिया ।। १ ।।**
**पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं। जागृति स्वप्नीं पांडुरंग ।। २ ।।**
**पडिलें वळण इंद्रियां सकळां। भाव तो निराळा नाहीं दुजा ।। ३ ।।**
**तुका म्हणे नेत्रीं केली आळखण। तटस्थ तें ध्यान विटेवरी ।। ४ ।।**

अभंग म्हणतां म्हणतां ते आनंदानें डोलूं लागले. इकडे जिजाईही मोठ्या उत्साहानें आणि आनंदानें कामाला लागली होती. आपलें म्हणणें त्यांनीं ऐकिलें, घरधनी घरांत आहेत, आजारी मुलाजवळ त्याचे वडील आहेत हें पाहून ती मोठ्या उल्हासानें कामाला लागली होती. अशा वेळीं मनुष्य

आपल्या विशेष आवडीचेंच काम अगोदर हातीं घेतो. जिजाईनेंही गोठा साफ करून आपली म्हैस स्वच्छ धुण्याचें काम पहिल्यांदां काढलें होतें. ती म्हैस तिची फार लाडकी होती. कारण ती तिला तिच्या माहेराहून मिळाली होती. तिच्या दुधावर तिला कांहीं दिवस दूधदुभतें भरपूर मिळालें होतें. आतां बरेच दिवस ती आटली होती. तिच्या शेणाचा मात्र तिला चांगला उपयोग होत होता. काशीला, म्हणजे आपल्या मुलीला शेणाच्या थापट्या करायला सांगून ती स्वतः म्हशीला धूत होती. मुलाला निजवितांना आपण कौतुकानें गाणें म्हणतों तसें जिजाई आपल्या म्हशीला कौतुकानें ओव्या म्हणत धूत होती —

**कुडचाभर नीर । कुडचाभर नीर ॥**
**करी म्हशीला निर्मळ । माज्या त्या ॥**
**मंगळाईची मूरती । पुनं गांवची बाई ती । माजी म्हस ॥**

मंगळाई ही तिच्या माहेरची देवी होती. तिच्यावर तिची फार भक्ति होती. विठ्ठल तुकारामांच्या संसाराचा 'इस्कोट' करतो आणि जो काय आपल्याला संसार थोडा फार चालवितां येतो तो मंगळाईच्या कृपेनें चालवितां येतो अशी तिची भावना होती. आपला हा मंगळाईचा अभिमान आपल्या मुलांनाही वाटावा अशी तिची इच्छा होती. म्हणून शेवटची ओवी म्हणतांना तिनें आपल्या काशीकडे पाहिलें. तों काय, ती थापट्या थापायच्या सोडून शेणाची विठ्ठलमूर्ति करण्यांतच दंग झाली होती. जिजाईला संताप आला. ती तिच्या अंगावर ओरडली,

"कारो, कारो, फतकल घालून काय बसलीयास? आनि तुला सांगितलं काय नि करतीयास काय?"

अंगाला आळोखे पिळोखे देत काशी म्हणाली, "मला बाई आतां लई कट्टाळा आलाया. म्हशीचं काम तरी किती करायचं तुज्या? दुदाचा एक थ्यांब तरी देतिया काय कंदीं?"



जिजाई आपल्या म्हशीला कौतुकानं ओव्या म्हणत धूत होती.



'... पण शान काय खायाचं हाय व्हय ?'

"रांडल्याकांनो, माज्या म्हायेरास्न ही म्हस मिळाली म्हून तुमी हे दिस बगतायासा. आत्तां कुठं धा-पांच वर्सांत ती आटलीया म्हून तुमची जीब चुरचुराया लागलीया, व्हय?" म्हशीला कुरवाळीत जिजाई पुढें म्हणाली, "माझी बाई ती. लई पायगुनाची. दुद न्हाई तर न्हाई, पन शान तर देतीया."

"आई, दूद दिलं असतं तर आमी प्यालों तरी असतों, पन शान काय खायाचं हाय व्हय?"

काशीच्या ह्या टोमण्यामुळें जिजाईला राग आला आणि एक धाट घेऊन तिच्यावर उगारीत ती म्हणाली,

"चल, चल, तूं तरी कुणाची पोरगी!"

आईचा तो आवेश बघून काशी हसत हसतच तेथून पळून गेली. जिजाई पुन्हा आपल्या म्हशीला कुरवाळीत म्हणाली,

"माझी बाई ती..........

**म्हायेरची मंगळाई। म्हायेरची मंगळाई॥**
**दूद देई लई। माझ्या म्हशीला। माजी गुणाची बाई॥"**

एवढ्यांत मधल्या घरांतून

"आई ऽऽऽ, आई ग ऽऽ, आई, ऽऽ ग ऽऽ." असें महादेवाचें विव्हळणें तिला ऐकूं आलें. तें ऐकून जिजाई किंचित् त्रासिक स्वरानें म्हणाली,

"च् च् च्, जीव अगदीं भंडून गेला बाई. मी एकटं मानूस करूं तरी काय काय? त्या पोरव्याजवळ बसूं कां म्हशीचं करूं? अन्.... ह्ये आमचं येडं ग्येलं वाटतं उटून त्येच्या जवळनं."

तोंच तुकारामांच्या भजनाचा शेवटचा चरण तिला ऐकूं आला.

## "पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ॥"

ती तशीच आवेशानें तुकोबाजवळ गेली आणि त्याना वेडावीत म्हणाली.

"ॲ हा हा, प्यांडुरंग ध्येनीं प्यांडुरंग म्येनीं. आग लावा तुमच्या त्या पांड्याला. चला आमंदी पोराजवळ."

असें म्हणत तिनें त्यांना ओढीतच महादेवाजवळ आणिलें. त्याला त्यांच्या मांडीवर आदळत ती म्हणाली.

"ध्या या कारट्याला. म्हयना झाला. घरांत प्वार माशावानी तडफडतया, त्याचं काय हाय काय तुमच्या जीवाला? सदान्‌कदा प्यांडुरंग ध्येनीं, प्यांडुरंग म्येनीं."

"हं हं आवले, बेतानें! हळू बोल जरा. तो आजारी आहे ना?"

"व्हय व्हय! त्येच मगापस्नं तुमच्या म्होरं वराडतुंया. त्येला ववशद विवशद करायचं हाय का न्हाई?"

तुकोबांनीं अगदीं गंभीरपणें उत्तर दिलें,

"अग, पांडुरंगासारखा धन्वंतरी आणि विठ्ठलनामासारखं औषध त्रिभुवनांत तरी मिळेल का?" नंतर महादेवाकडे वळून ते त्याला म्हणाले, "बाळा, तूं पांडुरंगाचं नांव घे म्हणजे बरा होशील हं!"

महादेवानेंही म्हटलें, "पांडुरंग, पांडुरंग."

त्याबरोबर जिजाई अधिकच संतापली आणि महादेवाला तुकोबांच्या मांडीवरून खालीं ओढीत म्हणाली.

"हां! हां खबरदार म्हाद्या, जीबन् जीव हांसडून काडीन त्या पांड्याचं नांव घेतलंस तर. घरांत एक येडं हाय तेवडं पुरें झालं."

"अयाइ ऽऽऽ, अग आई ऽऽग ऽऽऽ"

त्या हिसक्यानें महादेव कळवळला. जिजाई तुकारामबुवांना गदगद हलवीत म्हणाली.

"बगा बगा जरा डोळे फोडूनशान. पोरगं म्हशीवानी वराडतया!"

" खरंच आहे. ओरडणार नाहीं तर काय करील विचारा. तूं त्याला माझ्याजवळही बसूं देत नाहींस आणि तूंही त्याच्याकड बघत नाहींस. दूध न देणाऱ्या त्या म्हशीमागें असतेस तूं दिवसभर."

तुकारामांनीं हसत हसत दिलेला तो विखारी टोमणा जिजाईला फार लागला. ती एकदम उसळून म्हणाली.

"हं हं, माज्या म्हशीचं नांव काडूं नगासा हं. अदुगर सांगून ठेवतें."

" कां ? ती माहेरची आहे म्हणून ?"

तिच्याकडे पाहत पुन्हा हसतच विनोदानें म्हणून ते म्हणाले. जिजाईही पहिल्यासारख्याच उसळलेल्या स्वरानें म्हणाली,

" व्हय व्हय म्हायेराची हाय म्हून ती मला लई आवडतीया. काय म्हननं हाय तुमचं ? म्हायेरच्या वरवंट्यानें आमा बायकांचं डोस्कं फुटलं तरीबी रगत न्हाई येत त्यांतनं कंदी. जवातवा, जत्रातवा, माज्या म्हायेरचं नांव काडतायसा. आज न्हाई, तर चार वर्सानं माजी म्हस दूद देईल. पन रात-दिन तुमी त्या काळ्याचं नांव कुटतायसा, काय दिलं त्येनं ! समद्या घराचं वाटुळं केलं. खायाला भाकरीचा तुकडा बी न्हाई ठेवला, पोरं-बाळं आजारी पाडलीं. त्या मेल्या काळतोंड्यानं माझ्या म्हशीचं दूध बी आटवलं."

"अग, पण पांडुरंगाला कां शिव्या देतेस ?"

"शिव्या ?" ती अधिकच उसळून म्हणाली, "आतां तुमच्या त्या पांड्याला नुसत्या शिव्यांवरच ठेवत न्हायी. ह्या म्हाद्याला न्हेऊन हापटतें त्येच्याम्होरं. चांगलीं पांच खेटरं मारतें आनि इच्चारतें चांगलं तुमच्या त्या धन्व्यंतऱ्याला —"

आणि खरोखरीच रागाच्या त्या भरांत जिजाईनें तुकोबांचा जोडा हातांत घेतला आणि एका हातानें महादाला फरफटत विठोबाच्या देवळांत आणिलें.

अनुक्रम 29608
विभाग ना. वा.
क्रमांक 156-11
नों. दि. 3-7-61

# ३

त्या वेळीं विठोबाच्या देवळांत सालोमालो कीर्तन करीत होते.

सालोमालो हे एक धंदेवाईक कीर्तनकार देहूंत येऊन राहिले होते. त्यांच्या उपजीविकेचा तोच धंदा होता. तो चाललाही होता चांगला. धंद्यानें हरिदास पण वागण्यानें चंगी भंगी अशी त्यांची वृत्ति होती. तेवढ्यापुरतें थातुर मातुर करून चार पैसे मिळविले कीं झालें काम असे ते पोटापुरते हरिदास होते. अर्थातच तुकोबांसारख्या खऱ्या भक्तीच्या हरिदासापुढें आतां त्यांचें तेज पडेनासें झालें होतें. हळुहळू तुकोबांच्या अभंगांचा देहूंत बराच प्रसार झाला होता. देवळांत कोणाचेंही कीर्तन किंवा भजन चाललें म्हणजे त्यांना साथ देण्यास तुकारामबुवा स्वतः त्यांच्यामागें टाळ धरीत. ते कीर्तनकाराला किंवा भजनीबुवाला साथही देत आणि स्वतःचेही अभंग गात. ते भक्तिपूर्ण तल्लीनतेनें गाऊं लागले म्हणजे श्रोतेही अभावितपणें डोलूं लागत. त्यांच्या अभंगांतील प्रासादिक आणि सोप्या शब्दरचनेमुळें ते लोकांच्याही तोंडांत सहज बसूं लागले होते. त्यामुळें साहजिकच सालोमालोसारख्या रुक्ष कीर्तनकाराला श्रोत्यांची चांगलीच उणीव भासूं लागली. श्रोते कमी झाल्यामुळें प्राप्तीही कमी झाली. आणि हें सगळें तुकोबांमुळें झालें म्हणून सालोमालो त्यांचा द्वेष करूं लागले.

पण तुकोबांचा द्वेष करून किंवा त्यांची नुसती निंदा करून पोट भरण्यासारखें नव्हतें. त्यांचे अभंग आणि ते म्हणण्याची त्यांची तल्लीनता हीं त्याच्या पोटाआड येत होतीं. ती अडचण दूर करण्यासाठीं सालोमालोनें एक नवीनच शक्कल काढली.

गांव तेथें म्हारवडा असायचाच! देहू गांवांत तुकोबांचे चाहते होते तसेच द्वेष्टेही होते. त्यांची कोणी टवाळी करूं लागले तर गंमत म्हणून टवाळी करणारेही पुष्कळ लोक तेथें होते. अशा लोकांचा एक घोळका करून सालोमालोनें तो आपल्या भजनीं लाविला. "त्याला काय येतंय, तो शूद्र, वाणगटाचा धंदा करण्यापुरतं 'र, ट, फ' शिकलेला. त्याला काय गीता, भागवत, उपनिषदें येताहेत म्हणून तो असले गूढ अर्थवाही अभंग तयार करील! अहो, ते मी तयार करतों आणि तो मात्र आपले म्हणून दडपून देतो. आणि तुमच्यासारखे मूर्ख लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात." असा तो तुकोबांविषयीं उलटा प्रचार करूं लागला.

खरा प्रकार असा होता कीं तुकोबांचे अभंग लोकांना आवडतात हें लक्षांत येतांच कोणत्याही हिकमतीनें सालोमालो त्यांचा अभंग मिळवी आणि तोच आपल्या कीर्तनांत म्हणे.

आत्तांचाही प्रसंग तसाच होता. जिजाई महाद्याला घेऊन देवळांत आली त्या वेळीं सालोमालो कीर्तन करीत होते. तुकोबांचाच अभंग अगदीं जस्साच्या तस्सा त्यानें म्हणून संपविला होता. फक्त शेवटच्या चरणांत फरक केला होता.

**"सालो म्हणे नेत्रीं केली ओळखण। तटस्थ तें ध्यान विटेवरी॥"**

आणि अभंगाचें विवरण करतात तशा थाटांत तो आपल्या श्रोत्यांना पुढें सांगूं लागला.

"हा आमचा अभंग. पण त्या तुक्यानें त्या अभंगांतील 'सालो म्हणे' एवढे शब्द काढले आणि घातले, 'तुका म्हणे!' झाला त्याचा अभंग! सुटला सगळ्यांना सांगत कीं हा माझाच अभंग म्हणून. झाला लागलाच संत. अहो तो पक्का चोर आहे चोर, म्हणे संत!"

लागलींच तेथील श्रोत्यांपैकीं त्याच्या एका बगलबच्च्यानें त्याला दुजोरा दिला.

"अहो हा एवढाच काय पण तो तुक्या आपले म्हणून जे अभंग म्हणतो ते सगळे असेच आहेत. अगोदर अभंग करावेत ह्यांनीं, आणि त्यांत नुसतं 'तुका म्हणे' घातलं कीं झाला त्याचा अभंग. अहो मीसुद्धां उद्यां पाहिजे तेवढे अभंग करीन. आहे काय त्यांत — **तटस्थ तें ध्यान बंब्या म्हणे.**"

त्याच्या ह्या कोटीवर सगळ्या श्रोत्यांत एकच हशा पिकला.

"अहो, पक्का चोर आहे तो" सालोमालो पुढें बोलूं लागला, "आणि आव केवढा मोठा आणतो. गळ्यांत माळा काय घालतो, काखेंत तंबोरी काय घेतो, अशानें का कुठें संत होतो? तुका म्हणे ऐशा नरा —"

बोलण्याच्या ओघांत खरें तें बाहेर पडलें आणि लागलीच त्यानें जीभ चावली. पण मोठ्या शिताफीनें त्यानें सांवरून घेतलें.

"च् च् च् हें पाहिलं, अस्सं होतं. आतां आपलं बोलणं चाललं होतं ना. बसलं तेंच तोंडांत, पण त्याचं मूळ आहे हें असं—**सालो म्हणे ऐशा नरा। मोजूनि माराव्या पैजारा॥**"

'जय जय विठोबा रखुमाई, जय विठोबा रखुमाई' 'जय हरि विठ्ठल' 'जय जय विठ्ठल' चा गजर करीत सर्व लोक टाळ्या वाजवूं लागले.

बरोबर त्याच वेळीं जिजाई देवळांत घुसून सरळ विठोबाच्या मूर्ती-समोर गेली आणि त्याला उद्देशून बोलूं लागली,

"विठ्या, काळ्या, माज्या साऱ्या घरादाराचा इस्कोट केलास आतां हे बगितलंस माज्या हातांत काय हाय त्ये? बोल. ह्या पोराचा बाप रातदिस तुज्या नांवानं टाळ कुटीत बसलाया. ह्याला बरं करतोस कीं हानूं टाळकींत तुज्या?"

आणि खरोखरीच तिनें जोड्याचा हात मूर्तीवर उगारला.

त्याबरोबर सालोमालो तेथूनच ओरडला,

"ए, ए गांवभवानी, तूं मनुष्य आहेस कीं लावसट आहेस?"

जिजाईनेंही त्याला तसेंच खेकसून उत्तर दिलें.

" अरं, मनुक्ष हाय मनुक्ष! तुज्यावानी टाळकुठ न्हाई. तूं कोन इच्यारणारा मला?"

एवढ्यांत पांडुरंगानेंच चमत्कार केला म्हणावयाचा. महादेव चांगला खडखडीत बरा झाला. तो आईला म्हणाला,

" आई, आई बघ माझ्याकडं, आतां कसं अगदीं छान बरं वाटतंय मला."

जिजाईनें महाद्याकडे पाहिलें. खरोखरीच तो बरा झाला होता. जिजाईला केवढा आनंद झाला! त्याचें तोंड कुरवाळीत ती म्हणाली,

" म्हाद्या, म्हाद्या, खरंच कीं! बेस झालास कीरं माझ्या बाबा. माझी मंगळाई हायच तशी. तिच्या अंगाऱ्याचा गुन बरं काय ह्यो म्हाद्या. ह्यो बग पदरांत बांदून ठेवलाया तुज्या नांवानं."

तिनें महादेवाला अंगारा लाविला आणि त्याला कडेवर घेऊन ती आली तशाच आवेशानें देवळाच्या बाहेर निघून गेली.

आपला सहज विनोद आवलीला इतका झोंबेल आणि त्याचा इतका भयंकर परिणाम होईल ही तुकोबांना कल्पना नव्हती. पण आपल्या आजारी मुलाचीही पर्वा न करतां त्याला ती फरफटत नेऊं लागली आणि खरोखरीच तिनें जोडा घेतला तेव्हां मात्र तिच्या खऱ्या रागाची तुकोबांना कल्पना आली. त्यांना एकदम धक्का बसला. ती खरोखरीच विठोबाला जोड्यानें मारील कीं काय अशी त्यांना भीति वाटली. तिला आवरण्यासाठीं ते तिच्या पाठोपाठ गेले. ते देवळांत यायला आणि जिजाई तेथून निघून जायला एकच गांठ पडली होती. तुकोबांना पाहतांच सालोमालो उसळला. जिजाईचा सगळा राग त्यानं तुकोबांवर काढला,

" काय रे तुक्या, देव म्हणजे तुला रस्त्यांतला धोंडा वाटला होय? तुझ्या त्या लावसटीनं खेटरानं मारून आज देवाची विटंबना केली. लाज नाहीं वाटत तुला?"

तुकोबा अगदीं गहिंवरून दुःखाच्या कातर स्वरांत म्हणाले.

" खरंच तिनं देवाला खेटरानं मारलं? विटंबना केली देवाची? अरेरे! पांडुरंगा, किती पापी मी! पांडुरंगाची विटंबना? घोर अपराध झाला माझ्या हातून. सालोमालो, आतां तुम्ही सांगाल ती शिक्षा मी आनंदानं सोशीन."

दु:खानें अगतिक झालेल्या तुकोबांच्या ह्या मन:स्थितीचा सालोमालोनें भरपूर फायदा घेतला. त्यावेळीं आपण कांहींही सांगितलें तरी तुकोबा ती शिक्षा म्हणून मान्य करणार ही त्याची खात्री झाली. त्यानें किंचित् विचार करून कठोर स्वरांत त्यांना शिक्षा सांगितली.

" तुक्या, त्याला एकच शिक्षा आहे. तूं पुन्हा ह्या देवळांत पाऊल सुद्धां टाकतां कामा नये."

"काय? काय? ...."

तें ऐकून तुकोबांच्या अंत:करणाला धक्का बसला. दुसऱ्या कोणत्याही शिक्षेपेक्षां त्यांना ती शिक्षा भयंकर वाटली. ते अगदीं रडव्या चर्येनें सालोमालोकडे पाहात करुण स्वरांत 'काय...काय' एवढेंच म्हणाले. पुढें त्यांना बोलवेचना. त्यांनीं आपली सजल दृष्टि पांडुरंगाच्या मूर्तीकडे वळविली. सालोमालो पहिल्यापेक्षांही तिरस्कारी कठोर स्वरांत म्हणाला.

"काय? काय? ऐकूं येत नाहीं? पुन्हा ह्या देवळांत तूं पाऊल टाकतां कामा नये."

पांडुरंगाच्या मूर्तीवरील तुकोबांची दृष्टि ढळली नाहीं. अगदीं दीन स्वरानें त्यांनीं जणूं पांडुरंगालाच विचारलें.

"काय मी देवळांत येऊं नको? विठ्ठलाचं दर्शन हेंच माझं जीवन."

"आणि त्याला खेटरानं मारणं हें तुझं भजन?" तोंड वेडेंवांकडें करीत सालोमालोनें तुकारामाला आणखी एक विषारी टोमणा दिला.

तुकोबांनीं दीनवाण्या स्वरांत सालोमालोची दया भाकली.

"नको नको, दया करा माझ्यावर. मला दुसरी कोणतीही शिक्षा द्या, पण माझ्या पांडुरंगाच्या दर्शनांत अंतर पाडूं नका."

त्याला वेडावीत सालोमालो म्हणाला,

"आ हा हा ! लोकांना वाटावं केवढा पांडुरंगाचा भक्त ! चल, हो बाहेर. पुन्हा देवळांत पाय टाकलास तर तंगडी मोडून टाकूं.
**सालो म्हणे ऐशा नरा । मोजूनि माराव्या पैजारा ॥"**

आतां ही शिक्षा भोगल्याखेरीज गत्यंतर नाहीं असें तुकोबांना वाटलें. त्यांनीं देवाची शेवटची प्रार्थना केली.

"पांडुरंगा, सात जन्म माझ्या कातड्याचे जोडे करून तुझ्या पायांत घातले तरीही माझ्या हातून झालेल्या पातकाचं क्षालन होणार नाहीं. माउली, लेकरांचे हजार अपराध पोटांत घालणारी तुझी माया आतांच कशी आटली ? माउली, तूं लेकराला दूर लोटलंस, पण हें लेकरूं तुला कसं बरं विसरेल ? पाहूं दे माउली, आतां तुला एकदा डोळे भरून पाहूं दे. पुन्हा मला तुझं दर्शन होणार नाहीं. तुझं ध्यान हेंच आतां माझं जीवन.

**तुका झाला सांडा । विटंबिती पोरें रांडा ॥**
**घडे एकांताचा वास । तरीच नास या संबंधाचा ॥**

विठ्ठल माउली, विठाई माऊली."

असा अगदीं आर्त स्वरानें टाहो फोडीत तुकोबा त्या देवळांतून बाहेर पडले. त्यांचें मन आतां इतकें बेचैनपणें बावरून गेलें होतें कीं लांब कुठें तरी जाऊन पापक्षालनासाठीं विठ्ठलनामाचा ध्यास घेतल्यावांचून त्यांच्या मनाला एवढी सुद्धां शांति मिळणार नव्हती. देवळांतून बाहेर पडल्यावर त्यांचे पाय गांवाच्या बाहेर जाणाऱ्या रस्त्यालाच वळले.

तें पाहून सालोमालोला केवढा आनंद झाला ! जिजाईचे त्यानें मनांतल्या मनांत हजार उपकार मानिले. स्वतःच्या प्रसंगावधानाची त्याची त्यालाच धन्यता वाटली. जिजाईनें विठोबाला खेटरानें मारिलें असें दडपून सांगून तुकारामाचें सावज धरिलें, त्याची मुंडी मुरगळून त्याला देवळांतून हांकलून लाविलें अशा मोठ्या समाधानांत सालोमालो तेथून आपल्या घरीं निघून गेला.

# ४

त्या घोरतर अपराधाच्या जाणीवेनें वेडावलेल्या मनस्थितींत तुकोबा जे तेथून निघाले ते सरळ भामनाथ डोंगरावर आले. तेथें त्यांनीं लाचार मनानें पांडुरंगाची सहस्र वेळां क्षमा मागितली आणि शेवटीं त्याच्याच ध्यानांत निमग्न झाले. मग त्यांना समाधान वाटूं लागलें. हळूहळू त्यांना असेंही वाटूं लागलें,

" छे: ! आवलीनं देवाला खेटरानं मारलं नसेल. ती कितीही कजाग असली नि कितीही रागावली असली, माझ्या पांडुरंगाला ती कितीही टाकून बोलत असली, किंवा तिनें कसलाही आव आणला, तरी प्रत्यक्ष देवाला खेटर मारण्याचं धाडस ती करणार नाहीं. नाहींच ती करणार तसं. "

आणि जणूं काय त्यांना हें विठ्ठलानेंच सांगितलें असा त्यांना भास होऊन त्यांचा त्या विचारावर विश्वास बसूं लागला. त्यांच्या मनाला शांति मिळूं लागली. वाईट विचारांनीं गोंधळलेल्या मनाला सुविचार सुचवायला निर्जन, एकान्तासारखा दुसरा सखा नाहीं ही त्यांची खात्री झाली. त्यांच्या तोंडून सहज उद्गार निघूं लागले,

**" वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें। पक्षीही सुस्वरें आळवीती ।।**
**येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुणदोष अंगा येत ।।**
**आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करूं ।।**
**कथा कमंडलू देह उपचारा । जाणवितो वारा अवसरू ।।**
**हरीकथा भोजन परवडी विस्तार। करूनि प्रकार रुचि सेवूं ।।**
**तुका म्हणे होय मनासि संवाद। आपुलाचि वाद आपणासि ।।१।।**

आणि ' पांडुरंग पांडुरंग ' म्हणत मनाशीं संवाद करण्यांत ते इतके रंगून गेले कीं ते घर-दार, तहान-भूक सगळें सगळें विसरून गेले.

पण जिजाबाई त्यांना विसरली नव्हती. आज तर ती त्यांची अधिक आतुरतेनें वाट पाहात होती. इतके दिवस आजारी असलेला मुलगा एकदम खडखडीत बरा झाला होता. तें म्हाद्याचें उमललेलें तोंड तुकाराम-बुवा केव्हां एकदा बघतील असें तिला झालें होतें.

" आज मी बाबांच्या ताटांत जेवणार " म्हणून म्हाद्यानेंही हट्ट घेतला होता. तोही त्यांची सारखी वाट पाहात होता. काशीही तितक्याच आतुरतेनें त्यांची वाट पाहात होती. पण दोन प्रहर टळून गेली तरी तुकोबांचा पत्ता नाहीं हें पाहून सगळ्यांचींच तोंडें उतरलीं होतीं. सकाळीं आपण पांडुरंगाला फार टाकून बोललों म्हणून ते माझ्यावर रागावले असले तरी पोरांसाठीं तरी जेवण्याच्या वेळीं त्यांनीं घरीं यायला पाहिजे होतें असें जिजाईला वाटत होतें. शेवटीं काशी नि महाद्या तुकोबांना हुडकायला म्हणून गेलीं. पण तींही निराश होऊन परत आलीं. महादेव तर अगदीं कंटाळून गेला होता. तो म्हणाला,

" आमी सारा गांव धुंडाळला बग आई! पन बाबा कुठंबी गवसलं न्हायती."

" त्या काळ्याच्या देवळांत बगितलासा ?"

" बगितलं की."

" आनि त्या घेनबा पाटलाकडं."

" हं."

" मग गेलं वाटतं त्या भामागिरीवर."

जणूं काय ती स्वतःशींच पुटपुटली. तिची खात्रीच होती ती! आणि मग काशी-महाद्याला जवळ घेऊन त्यांच्या तोंडावरून हात फिरवीत ती म्हणाली.

"पोरांचीं त्यांडं भुकेनं कशीं चिमनीवानी झाल्यातीं! ह्ये बगा पोरांनो, तीन पार व्हत्याल आतां. आतां त्येंची वाट बगूं नगसा. तुमी ज्येवा. तुमचं ज्येवान झालं म्हंजे मी न्हेईन त्येंचं ज्येवान."

असें म्हणून तिनें त्यांचीं पानेंही वाढलीं. दोनच पानें बघून महादेव तिला म्हणाला,

"आणि आई तूं ग? तूं आतां किती वेळ वाट बगणार?"

"तूबी आतां भाकर खाऊनशान घे की, कालपस्न उपाशी हाएस. तुज्याबी पोटाला भूक लागली असल." काशीही म्हणाली.

काशी-महाद्याची आपल्यावरील ती माया बघून जिजाबाईला केवढी धन्यता वाटली. त्यांच्या तोंडांवरून हात फिरवीत ती म्हणाली,

"कशीं माजीं प्वारं हायतीं? आई, मंगळाई! द्रष्ट लागूं देऊं नग ग बाई माज्या पोरांस्नी. बाबांनो, त्येंच्या पोटांत भाकरी गेल्याबगर घासबी उतरायचा न्हाई माज्या नरड्याखालीं."

काशीला उद्देशून महादेव थोडें मिस्कीलपणें म्हणाला,

"हंऽअं! काशे, बगितलंस आईची बाबावर किती माया आहे ती?"

जिजाई अभिमानानें म्हणाली, "अन् त्येंची बी माज्यावर लई माया हाये. मला बगितल्याबगार त्येस्नीबी गमत न्हायी."

लगलीच काशी म्हणाली, "आई, तुझी बाबावर एवढी माया हाय म्हणून तूं रोज त्यांच्याबरोबर भांडतीस व्हय?"

मोठ्या माणसालाही सुचणार नाहीं असा तो काशीचा गोड, अंतःकरणाचा ठाव घेणारा प्रश्न ऐकून जिजाईला जो आनंद झाला तो तिलाही अनुपम होता. ह्या वेळीं तुकोबा जवळ असते तर त्यांच्याकडे नुसत्या बघण्यानें तिनें तो व्यक्त केला असता. आतांही त्यांची अमूर्त मूर्ति तिच्या डोळ्यांपुढें उभी राहिली आणि त्यांच्यावरचें आपलें प्रेम ह्या पोरांनींसुद्धा ओळखलें असें वाटून सलज्ज पण कठोर भासावा अशा सुरांत ती काशीला म्हणाली,

"अर कार्ट्यांनो, खावा म्होरं बगून. लइ वाईट कार्टीं हायती. म्हाद्या, काशे,

मी जातुया हं त्येंचं ज्येवान घेऊनशान. मी येयीपतुर घर सांबाळा. भांडं बिंडूं नगासा हं. ”

तिनें मुलांना इतकें बजावलें आणि जेवण घेऊन ती अर्धस्मित मुखानेंच घराबाहेर पडली. काशी-महाद्याच्या त्या साध्याच वाक्यांनीं जिजाईला तुकोबांच्या सहवासांतील पूर्वींच्या कितीतरी गोड आठवणी करून दिल्या. त्या आठवणींच्या नादांतच आज ती चालली होती. चालतां चालतां एका कांट्यावर तिचा पाय पडला. असावध चालीचा तिचा तो पाय कांट्यावर इतक्या जोरानें पडला कीं तीक्ष्ण पात्याचा भालाच कोणी तरी आपल्या पायांत खुपसला असें तिला वाटलें. ती कळ तिच्या मस्तकाला गेली. आणि आई ऽऽग ऽऽ आई ऽ ग ऽ आई ऽऽ ग करीत ती मटकन् खालीं बसली. डोळे आपोआप पाण्यानें अगदीं डबडबून गेले. खालीं बसण्याबरोबर कांटा मोडलेला पाय तिनें मुरडून घेतला. कांटा बघितला. पण डोळे पाण्यानें भरलेले असल्यामुळें तिला तो सरळ दिसलाही नाहीं. तिला कांटा दिसला नाहीं पण तो चांगला टणक असला पाहिजे आणि तो सहज निघण्यासारखा नाहीं अशी मात्र तिची खात्री झाली. आतां तिला अधिकच अगतिक झाल्यासारखें वाटलें. तिनें विवळत विवळतच चहूंकडे पाहिलें.

गांवापासून दूर असलेल्या त्या रानांत डोंगराच्या पायथ्याशीं, कधींच कोणी असण्याचा संभव नाहीं नि त्यांत अशा तीन प्रहरच्या वेळीं तेथें तिला कोण दिसणार? पण योगायोग असो किंवा जिजाईचें दैवच थोर म्हणून असो, कांटा मोडण्याबरोबर व्याकुळ होऊन तिनें फोडलेला टाहो जणूं पांडुरंगानें ऐकला आणि म्हाताऱ्याच्या वेषानें तिच्यापुढें उभा राहून तो अगदीं कळवळ्यानें म्हणाला,

“काय झालंया? कांटा मोडला व्हय? बगू बगू- अरऽरऽ- थांब थांब जरा, त्यो कांटा तसा निगायचा नाई; मी काडतुं हं ” असें म्हणत कांटा काढण्यासाठीं त्या म्हाताऱ्यानें तिचा पाय आपल्या मांडीवर घेतला देखील.

" लवकर काड बाबा ! आमचं त्ये येडं...." जिजाई म्हणाली.

' त्ये येडं ' कोण हें त्या म्हाताऱ्याच्या एकदम लक्षांत आलें नाहीं. पण लागलीच त्याला कल्पना आली.

" कोण ? तुकोबा व्हय ? "

" व्हय व्हय-त्येच हा ऽऽऽऽ सकाळपसनं उपाशी बसल्याती. भुकेनं अगदीं कासावीस झालं असत्याल – अग आईऽऽऽऽ...."

" क्येवढा मोठा कांटा हाय ह्यो ? " त्या म्हाताऱ्यानें कांटा काढून जिजाईला दाखवीत म्हटलें.

कांटा निघाल्यावर जिजाईलाही बरें वाटलें. ती म्हणाली, " हा–हा–लई बरं वाटलं. काय नांव बाबा तुजं ? "

" इट्टु. "

तें नांव ऐकून जिजाई एकदम उसळली. " कोन इट्टू ? त्या काळ्याचं नांव ? हात् तुज त्वांड फुटलं. अगुदर बोला असतास तर तुला हुबं दिकून क्येलं नसतं माज्या म्होरं...."

जिजाई तेथून निघाली ती सरळ भामगिरीवर आली. पण बराच वेळ तिला तुकोबा कोठें दिसले नाहींत. आज त्यांनीं अगदींच वेगळी आणि अडचणीची जागा काढली होती. हुडकून-हुडकून बिचारी निराश झाली. एक क्षणभर विसांवा घ्यावा नि परतावें असें मनाशीं म्हणून ती खालीं टेकली न टेकली तोंच तिला तुकोबांचा " पांडुरंग, पांडुरंग " शब्द ऐकूं आला. त्याबरोबर ती चट्दिशी उठली आणि हसतमुखानेंच पुढें निघाली. तुकोबा दिसतांच तिला आनंद झाला पण ते विठ्ठलाच्याच ध्यानांत मग्न आहेत हें पाहून तिला रागही आला. त्याच आवेगांत ती म्हणाली,

" अवो, डोळ झाकून्शान काय बसलायसा ? घरांत बायकापोरं वरडत्यात तुमच्या नांवानं, अन् तुमी वराडतायसा दुसऱ्याच्या नांवानं. पोटाची तरी सुदबुद हाय काय ? अवो ऽऽऽ काय ऐकूं येतंय का न्हाई ? डोळ उगडा कीं जरा. बया–बया–बया...."



तुकोबांचा पत्ता नाहीं म्हणून सगळयांचींच तोंडं उतरलीं ...



'लवकर काढ बाबा! आमचं त्ये येडं ...'

तुकोबांनीं डोळे उघडून तिच्याकडे पाहिलें. त्यांची चर्या पाहून जिजाई कळवळली, "आई मंगळाई, लई, लई भूक लागली असल. हें घ्या पानी. खावा खावा, भाकरी, खावा अदुगर."

"आवले, तूं कशी आलीस इकडे?" तुकोबांनीं आश्चर्यानें विचारिलें.

"चालत-चालत, डोंगर चडत-चडत." जिजाईनें लागलीच उत्तर दिलें.

"खरं ग, पण मी इथं आहें हें तुला कसं समजलं?"

जिजाईनें एकदा तुकोबांकडे पाहिलें आणि मग तिनें अशा आत्म-विश्वासाच्या दृढ स्वरांत उत्तर दिलें,

"अंऽहं. त्यें पुरुषास्नी न्हाई ठावं व्हायचं. त्येला माज्यावानी बायकुच व्हाया व्होवं."

तुकोबांनीं एकदा जिजाईच्या तोंडाकडे पाहिलें. आपल्याविषयींचा तिच्या अंतःकरणांतला भाव त्यांना स्पष्ट दिसला. आपल्यापेक्षां तीच श्रेष्ठ आहे असेंही त्यांना वाटलें.

"खरं आहे, ह्याला म्हणावं खरी भक्ति. भक्ति कशी करायची हें आम्हांला तुम्हां बायकांपासून शिकलं पाहिजे. त्या भक्तीच्या जोरावर जसं तूं मला शोधून काढलंस तसं मलाही माझ्या पांडुरंगाला शोधून काढतां येईल."

"इस्तु घाला त्या काळ्याच्या डोसक्यावर. भुका लागून परान कासावीस झाल्याति. खावा अदुगर ती भाकरी."

विठ्ठलाच्या नांवाचा तो धिक्कार ऐकूनही तुकोबांना जिजाईचा राग आला नाहीं. त्या रागाच्या पोटांत केवढें अमृत भरलें आहे हें त्यांनीं अनेक वेळां पाहिलें होतें. त्यांनीं आपलें तोंड किंचित् हसरें केलें आणि जिजाईला विचारिलें,

"आवले, पोरांनीं भाकरी खाल्ली काय ग?"

"काय करत्याल, लई-लई वाट बगत व्हतीं तुमची. मग म्यांच म्हटले त्येस्नी खावा म्हून. पोरं कशीं रत्नावानीं हायतीं."

" खरं आहे " असें म्हणत त्यांनीं भाकरीचा घास मोडला आणि ते जिजाईला म्हणाले,

" आवले, तूंही बैस बघूं भाकरी खायला. "

" नग नग, होऊं द्या तुमचं, म्यां खाल्लंया. "

'म्यां खाल्लंया' असें जिजाई कां म्हणाली हें तुकोबांच्या लक्षांत आलें. त्यांची खात्री होती तिनें भाकरी खाल्ली नव्हती. तिच्या तोंडाकडे पाहात ते म्हणाले,

" नाहीं, आवले, शक्य नाहीं. हं घे बघूं " त्यांनीं आपल्या हातांतला घास तिच्या तोंडापुढें केला.

" नग, नग, होऊं द्या. "

' नग, नग, जी. ' ती लाजत लाजत म्हणाली, पण प्रेमोर्मींनीं तिच्या अंतःकरणांत केवढा कल्लोळ उडवून दिला होता.

" घे ग, घे ग. "

तुकोबांनींही लाडिक आग्रहानें तिच्या तोंडांत घास घातलाच. तिनेंही तो अगदीं अभावितपणें घेतला आणि म्हटलें,

" चला, काय न बायच. मी काय नवी न्हवरी हाय व्हय त्वांडांत घास घालाया. लोक बगत्याल कीं. "

आणि घास चावतां चावतां तोंडांत खडीसाखरेचा खडा विरघळावा तशा प्रफुल्ल चर्येनें चव घेत ती पुढें म्हणाली,

" लई ग्वाड, लई ग्वाड. ही भाकरी म्यांच केलिया का दुसऱ्या कुनी केलिया ह्येंच समजना. "

" अहाहा! खरोखरच माझं भाग्य थोर म्हणून तूं मला अशी प्रेमळ बायको दिलीस पांडुरंगा. "

" काय? काय म्हनालासा? पांड्यानं! त्यो बरा देतोय तुमास्नी. मला माज्या बानं दिली तुमाला. त्यो मस्त हरकल मला आपली ल्येक म्हनाया. नांव बी काडूं नगासा त्या काळ्याचं माज्या म्होरं. "

" आवले, खरोखरच माझ्या विठ्ठलावर तुझी भक्ति नाहीं का ग? "

“हं, इट्टल! त्यो तुमचा द्येव असल तुमास्नी मोटा, पन माजा द्याव तुमच्या इट्टलापरीसबी लई मोठा हाय.”

“तुझा देव विठ्ठलापेक्षां मोठा आहे? कोण? मंगळाई वाटतं!”

“अं, हं.”

“तर मग तुझ्या देवाचं नांव तरी काय तें सांग.”

“माज्या देवाचं नांव? जेवा आतां मुकाट्यानं. काय तरीच इचारतायसा. माजा द्याव बसलाया माज्या म्होरं भाकरी खात.”

आणि तिनें तुकोबांकडे अशा भावपूर्ण दृष्टीनें पाहिलें कीं त्यांना तिच्या देवाचें नांव सहज ओळखतां आलें आणि तें ओळखल्याबरोबर ते गंभीर झाले.

जिजाईनें आपल्या गंभीर देवाला जाब विचारला,

“येतोया काय तुमचा द्याव तुमच्या संग अशी भाकरी खाया? दुसऱ्याच्या घरादाराचा इस्कोट करायचा तेवडा त्येला ठावा हाय. त्येला काय त्येचं? त्यो हाय दगडाचा. त्येला काय ठावं हाडामासांच्या माणसांचं काय हाल व्हत्यात त्ये? आमचं एक जाऊं द्या. पन तीं प्वारं, त्येनी कुनाच्या त्वांडाकडे बगायचं? फाटकं–तुटकं चिरगुट, पन त्ये तरी व्होवं अंगावर घालाया? वाळ्ळा–सुका तुकडा पन त्यो तरी व्हावा प्वाट भराया? पन त्येचं काय त्या दगडाला? कंदी तरी पाजर फुटायचा त्येला? रात–दिस त्याच्या नांवानं हांका मारतायसा, त्या परीस पोराबाळांच्या पोटाकड बगितलंसा तर लई पुन लागल.”

जिजाईचा तो प्रत्येक करुण शब्द तुकोबांच्या अंत:करणाला जाऊन भिडत होता. त्यांनीं एक सुस्कारा टाकला. त्याबरोबर त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले,

“पोरं, पोरांचीं पोटं, अरेरे! पांडुरंगा!”

“त्यो काय सांगणार हाय? त्यो थोडंच आनून देनार हाय भाकरीचं पीट तुमास्नी? दोन दिस झालं घरांत जोंधळ्याचा दानाबी न्हाई. कुत्रीबी लई बरीं माज्या पोरांपरीस. गल्लीगल्लींत फिरून प्वाट तरी भरत्यात. अन् माजीं

प्वारं उप्पाशीं फिरत्यात. तरी तुमचा इट्ठल आणि पांड्या ! बायकापोरांस्नी उपाशीं मारून सरग मिलतुया व्हय ? अन् मिळाला तर त्यो करायचाय तरी काय ? "

जिजाईचें म्हणणें तुकोबांना शब्दशः पटलें. ते अगदीं गहिंवरून आले. ते तिला मध्येंच म्हणाले,

" खरं आहे तुझं म्हणणं, आवले. माझ्या डोक्यांत तूं चांगला प्रकाश पाडलास. मुलांबाळांना टाकून आणि प्रपंचाला कंटाळून हें रान गांठण्यांत खरोखर कांहीं पुरुषार्थ नाहीं. "

तुकोबांचे ते शब्द ऐकून जिजाईला कोण आनंद झाला !

" हां, आतां कसं बोललासा मानसावानी. आई मंगळाई, देवा खंडोबा, आतां मातर यांची बुद्धि पालटूं नग र बा. "

" आवले, हजारों तत्त्वज्ञान्यांचीं तत्त्वं बाजूला सारणारं तुझं हें व्यावहारिक तत्त्वज्ञान फारच श्रेष्ठ आहे. प्रपंचांत राहून परमार्थसाधन केलं पाहिजे. घराचा किंवा प्रपंचाचा त्याग करून परमार्थसाधनाला लागणारी चित्तशुद्धि होत नाहीं, तर अन्तःकरणांत माजलेलं विकारमोहांचं प्राबल्य नाहींसं करण्यानंच ती होते. तेव्हां मनुष्यानं आधीं प्रपंचच केला पाहिजे. "

" तुमचं त्ये लई, लई बोलनं, मला काय बी नगं ! पोरंबाळं द्यावच हायतीं. त्येंच्या जिवाचा तळतळाट घेऊनशान कुण्णाचंबी बरं होत न्हायी, एवढं मला ठावं हाय. "

आवलीचाच उपदेश तुकोबांनीं स्वतःच्या मनावर बिंबवून घेतला.

**जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ।।**
**उत्तमची गती उत्तम तो पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।**
**भूतदया गायीपशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ।।**
**शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ।।**
**तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ।।**

# ५

परमार्थसाधनाला लागणारी चित्तशुद्धि होण्यासाठीं अंत:करणांतलें विकारमोहांचें प्राबल्य नाहींसें करायला पाहिजे. तें प्रपंचांत राहून केलें पाहिजे. त्यासाठीं प्रपंच केला पाहिजे. प्रपंच करण्यासाठीं ‘ उत्तम वेव्हारें धन जोडलें ’ पाहिजे; आणि धन जोडण्याकरितां कामधंदा करायला पाहिजे, हें सगळें ठरवून तुकोबा घरीं आले होते.

हें सगळें अंत:स्फूर्तीनें ठरविल्यामुळें तुकोबांच्या अंगीं प्रपंच करण्याचा नवा उत्साह आला होता. तो त्यांच्या प्रत्येक बोलण्यांत दिसत होता. तीं दोघें घरीं आलीं, त्या वेळीं महाद्या आणि काशी दारांतच त्यांची वाट पाहात होतीं. तुकोबा दिसल्याबरोबर महाद्या ‘बाबा आले, बाबा आले’ करीत नाचतच पुढें गेला. त्याला तुकोबांनीं एकदम उचलून घेऊन त्याचें तोंड कुरवाळलें. काशी देखील ‘बाबा, बाबा’ करीत त्यांना बिलगली. तिलाही कुरवाळीत हाताला धरून ते घरांत गेले. मुलांनाही वडिलांचें हें आजचें वागणें अधिक प्रेमळ आणि लाडिकपणाचें वाटलें. महाद्यानें लाडिकपणें बोबड्या शब्दांत हट्ट घेतला ‘मला ऊस पाहिजे बाबा’ तुकोबांनींही त्याला सांगितलें, “हो हो, ऊसच काय पण तुला काय पाहिजे तें आणून देतों. काशे, तुलाही काय पाहिजे तें आणून देतों हं.” तें सगळें पाहून जिजाईला कोण धन्यता वाटली. तुकोबांनीं प्रपंच करण्याचें मनांत आणिलें तर ते तो चांगला नीटनेटका व व्यवस्थित करतील ही तिची खात्री होती. तुकोबा, जिजाई, काशी, महाद्या, आज सगळ्यांनाच आनंद झाला होता. आजच्यासारखा आनंदाचा दिवस तुकोबांच्या घरांत कितीतरी दिवसांनीं आला होता.

....२७

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तुकोबांनीं नित्यकर्मे आटोपलीं आणि ते कपडे घालून बाहेर निघाले. त्या वेळीं जिजाईनें त्यांना विचारलें,

" कुठं जानार आतां ? "

" कांहीं कामधंदा मिळतो काय पाहतों. "

" व्हय पन त्योच बगायला कुठं जानार म्हंतुया मी ! "

" ज्ञानबाकड जातों न् त्यालाच विचारतों. "

जिजाई एकदम आनंदानें म्हणाली,

" ब्यास–ब्यास, लई ब्यास ! मी दिकुन त्येंच सांगनार व्हतों. आई मंगळाई, धेनबाला चांगली बुद्दी देग बाई ! "

देहू गांवांत तुकोबांविषयीं आणि त्यांच्या कुटुंबाविषयीं सहानभूति बाळगणारी किंवा मधून मधून त्यांना हरएक प्रकारें मदत करणारी जी कांहीं मंडळी होती त्यांत ज्ञानबा हे एक होते. म्हणून तुकोबांना आणि जिजाईलाही त्याचीच आठवण झाली. सालोमालोचें तें कूळ होतें. त्याची एक जमीन ज्ञानबानें खंडानें लागणीला घेतली होती.

तुकोबा किंचित् हसले आणि पांडुरंग पांडुरंग करीत निघाले. जिजाईनें त्यांना पुन्हा सांगितलें,

" माजी मंगळाई तुमाला येश धेईलच बगा. ज्येवायला घरीं या हं ! मुलं वाट बगत बसत्याल. "

तुकोबा मानेनेंच 'हो' म्हणून पुढें निघाले. रस्त्यांतच सालोमालोचें घर होतें. घराच्या पडवींत इकडे तिकडे फेऱ्या घालीत सालोमालो तोंडानें कांहींतरी पुटपुटत होता. त्याच्या हातांत एक कागदही होता. तो तुकोबांचाच अभंग होता कीं काय कोण जाणे. एवढ्यांत त्याला तुकोबांचा 'पांडुरंग पांडुरंग' असा गंभीर शब्द ऐकूं आला. त्याबरोबर तो एकदम चमकला. त्यानें पुढें होऊन बाहेर पाहिलें, तों खरोखरीच तुकोबा होते. त्याला आश्चर्याचा धक्का बसला. एकदा गांवाबाहेर गेलेला तुकाराम परत येणार नाहीं अशी त्याची खात्री होती.

ती फोल ठरल्यामुळें तो उद्वेगानें स्वतःशींच पुटपुटला.

"आली काय ही ब्याद पुन्हा परत –"

त्याला त्यांचा रागही आला आणि दारांत येऊन तो त्यांच्यावर खेंकसूनच म्हणाला,

"कायरे संताच्या सोंगा, कां आलास परत? आणि आतां कुठं, देवळांत निघाला आहेस काय?"

तुकोबांनीं सरळ भावानें उत्तर दिलें,

"नाहीं महाराज, कांहीं तरी उद्योगधंदा बघायला आलोंय! पोट भरण्या-पुरता एखादा उद्योग आपण मला दिलात तर उपकार होतील माझ्यावर!"

सालोमालो उपहासानें हसला. ह्याच वेळीं ज्ञानबाही कांहीं कामासाठीं सालोमालोकडे आला होता, त्याच्याकडे पाहात तुकोबांची टर उडवण्याच्या स्वरांत तो ज्ञानबाला उद्देशून म्हणाला,

"पाहिलंत का ज्ञानबा, तुमचे हे तुकोबा धंदा शोधायला निघालेत. देशावरचं मठ कोंकणांत नेऊन विकणारे हे शिरोमणी! ह्यांना हो कोण धंदा देणार आहे?"

तुकोबांना चांगलें हिणवण्याची त्याला एक युक्ति सुचली. मोठा आव आणून तो त्यांना म्हणाला,

"हां, हां, आहे तुला एक धंदा, कोणता म्हणून नाहीं विचारलंस?"

तुकोबांना आशा वाटली. त्यांनीं उत्सुकतेनें सालोमालोच्या तोंडाकडे पाहिलें. सालोमालो पुढें म्हणाला,

"अरे भीक मागण्याचा! भीक मागावी, बायकापोरांचं पोट भरावं, उरलेलं विकून धनसंचय करावा; आणि भिक्षेवर राहणारा संत म्हणून मिरवावं. तेव्हां खुशाल परमेश्वराच्या नांवावर भीक मागण्याचा धंदा सुरू कर. थांब हं, मीच तुला पहिली भीक घालतों."

असें म्हणत भिक्षा आणण्यासाठीं सालोमालो वळला देखील. त्याबरोबर तुकोबा त्याच्या अंगावर संतापानें ओरडले,

"सालोमालो, मी भिकारी नाहीं. तुमच्या दारांत भीक मागायला आलों नाहीं. भिक्षेवर जगणारा तो काय माणूस म्हणायचा काय?

**भिक्षापात्र अवलंबिणें। जळो जिणें लाजिरवाणें॥**
**ऐसीयासी नारायणें। उपेक्षिजे सर्वथा॥"**

असें म्हणत त्याचा धिक्कार करून तुकोबा पुढें निघालेही. शेजारीं उभ्या असलेल्या ज्ञानबाकडेही त्यांचें लक्ष गेलें नाहीं. तेव्हां ज्ञानबानेंच त्याला हांक मारली आणि म्हटलें,

"तुकोबा, मी तुम्हांला उद्योग देतों. त्यानं तुमच्या भजनांतही व्यत्यय येणार नाहीं. तुम्हीं प्रपंच करायचा ठरवलं आहे. जिजानं सांगितलं मला!"

"फार फार उपकार होतील माझ्यावर." तुकोबा आदरयुक्त नम्रतेनें म्हणाले.

"मी जातोंय आळंदीला, चारदोन दिवस माझं शेत राखा. मी तुम्हांला काय द्यायचं तें समजून देईन."

सालोमालोला ज्ञानबाचा राग आला. पण करणार काय! 'काय मूर्ख आहेस' अशा भावानें तो ज्ञानबाला म्हणाला,

"काय ज्ञानबा, दुसऱ्याच्या शेतावर फार उदार झालाय? अहो, हा एकदा टाळ कुटीत बसला कीं गुरा-ढोरांनीं शेताचा सत्यानाश केला तरी पत्ता लागायचा नाहीं त्याला. मी मात्र खंड सोडणार नाहीं हं! सांगून ठेवतों अगोदरच."

ज्ञानबानें त्याला निश्चयानें उत्तर दिलें, "त्याची काळजी तुम्हांला नको. तुमचा खंड तुम्हांला मिळेल. चला तुकोबा."

ज्ञानबा तुकोबांना घेऊन शेतावर आला. त्यानें त्यांना सगळें शेत दाखविलें, बसण्याचा माळा दाखविला आणि म्हटलें,

"अगदीं कापायला आलंय शेत! खरं म्हटलं म्हणजे ह्या वेळीं मला जायला नको होतं, पण तसंच जरूरीचं काम आहे म्हणून जातोंय्. शक्य तितक्या लवकर येतों. तंवर शेत संभाळा. पाखरं न् गुरं-ढोरं नीट बघा हं."

" ठीक आहे. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. पांडुरंग तुमच्या कामांत तुम्हांला यश देईल. "

" जातों मी. तुमच्या घरीं जिजाला सांगून जातों. ती तुम्हांला इथंच भाकरी आणून देईल. "

मंगळाईच्या कृपेनें तुकोबांना लागलीच उद्योग मिळाला म्हणून जिजाईला केवढा आनंद झाला. तिनें आज मंगळाईला नैवेद्य देखील केला होता. तरी ते आज घरीं जेवायला आले नाहींत म्हणूनही तिला वाईट वाटलें नाहीं. कारण उद्योगाला लागल्यावर घरीं जेवायला यायला सवड व्हायची नाहीं, हें तिला माहीत होतें. काशी महाद्या मात्र ' बाबा आल्याबगार आमी भाकरी खाणार न्हायी ' असा हट्ट घेऊन बसलीं होतीं. त्यांची आज तिनेंच समजूत काढली,

" असा हट्ट करूं नगसा बाळांनो. घरच्या पुरसाला उद्योग-धंदा करून घर चालवाया व्होवं. आमच्या पोटा-पान्याची सोय त्येंनींच बगाया व्होवी. उद्योग सोडून त्ये कसं येतील ? तुमी खावा. मी त्येस्नी ज्येवान घेऊन जातों. सांच्यापारीं त्येंच्या संग ज्येवा तुमी, आं. हां, शानीं हायतीं माजीं प्वारं. "

" त्येस्नी ऊस आनाया सांग हं. "

" ऊस खाल्याबिगार सांची आमी भाकर खानार न्हायी बग " असें फुरंगटल्या चेहऱ्यानें म्हणत दोघांनींही दोन प्रहरचें जेवण केलें.

जिजाई जेवण घेऊन शेतावर गेली. तुकोबा माळ्यावर बसून चहूंकडे नजर फिरवीत शेत राखीत होते. ते आणि जिजाई इकडच्या-तिकडच्या गोष्टी बोलत दोघेंही तेथेंच जेवलीं. परत जातांना तिनें काशी-महाद्यांचा ऊस आणण्याचा निरोपही सांगितला. तुकोबाही म्हणाले,

" आणतों आणतों. ज्ञानबाकडनच चार ऊस मागून घेतों. "

आणि मग त्यांनीं विनोदानें तिचेंच कालचें वाक्य तिच्याच शब्दांत उच्चारलें,

" पोरं-बाळं द्यावच हायतीं .... "

" मग हायतींच.... " त्यांच्या त्या विनोदानें खुलून त्यांच्याकडे अर्धस्मित मुखानें पाहात जिजाई म्हणाली,

" मग नाहीं कोण म्हणतों! त्याच देवांना पाहिजे असलेला नैवेद्य आज मी घेऊन येतों, एवढंच सांगितलं तुला!"

" बरं–बरं–" असें म्हणत ती तेथून निघून गेली. जातां जातां तिनें दोन-तीनदां त्यांच्याकडे वळून पाहिलें. आजचें समाधान तिच्या अंत:करणांत मावत नव्हतें.

जिजाई मुलाबाळांत देव पाहत होती. तुकोबा सगळ्या सृष्टींत देव पाहात होते. 'ही सगळी चराचर सृष्टि परमेश्वराच्याच निरनिराळ्या रूपानें नटली आहे. तें तुझें रूप बघण्याची मला दृष्टि दे.' अशी ते पांडुरंगाची प्रार्थना करीत होते. त्यांनीं त्या भरघोस शेताकडे वरखालीं चहूंकडे नजर फिरवली आणि ते सद्गदित स्वरानें म्हणाले,

" पांडुरंग पांडुरंग, तूंच सगळीकडे भरला आहेस. कुठल्या का रूपांत असेना, तूं असाच सदैव माझ्या डोळ्यांपुढें राहा."

**सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति। रखुमाईच्या पति सोयरिया॥**
**गोड तुझें रूप, गोड तुझें नाम। देईं मज प्रेम सर्व काळ॥**
**विठो माउलीये, हाचि वर देईं। संचरोनी राहीं हृदयीं माझ्या॥**
**तुका म्हणे कांहीं न मागो आणिक। तुझे पायीं सुख सर्व आहे॥**

संध्याकाळीं ज्ञानबा परत आला. तो शेताची पाहणी करीत करीतच आला. शेत उत्तम स्थितींत होतें. त्याला तें नेहमींपेक्षां थोडें अधिकच चांगलें दिसलें. मिशीवर ताव देऊन आपण सालोमालोला सांगितलें त्याचें तुकोबांनीं चीज केलें म्हणून त्याला समाधान झालें. तो त्यांना म्हणाला देखील,

" तुकोबा, शेताची राखण छान अगदीं कसोशीनं केलीत हं! चांगली सालोमालोला थप्पड दिलीत. आतां खुशाल घरीं जा आणि उद्यां या. मला उद्यांही जायला पाहिजे. हें घ्या आजच्या कामाचं मोल."

असें म्हणत ज्ञानबानें एक शेर जोंधळे त्यांच्यापुढें केले. पण ते घेण्यासाठीं पदर पुढें न करतां तुकोबा म्हणाले,

" ज्ञानबा, आजच्या कामाचं मोल म्हणून दाणे नकोत मला. माझ्या मुलांना खाण्यापुरते ऊंस दे म्हणजे झालं."

तें ऐकून ज्ञानबा थोडें हंसला आणि म्हणाला, " असं ? ठीक आहे. मोल म्हणून हे दाणे घ्या ; आणि मुलांना खायला म्हणून ऊंसही देतों. मग झालं कीं नाहीं ? "

" पांडुरंगाचीच कृपा. " तुकोबा सद्गदित होऊन म्हणाले.

ज्ञानबानें दिलेलें कामाचें मोल आणि मुलांना दिलेला खाऊ घेऊन तुकोबा मोठ्या उल्हसित वृत्तीनें घरीं निघाले. काशी-महादा दारांत त्यांची वाटच पाहात होतीं. त्यांच्या खांद्यावर ऊंस दिसतांच टाळ्या वाजवीत 'बाबांनीं ऊंस आणले, बाबांनीं ऊंस आणले' म्हणत दोघेंही त्यांच्या अंगाला झोंबूं लागलीं. जिजाईही हास्यवदनानें तुकोबांकडे पाहात होती. मुलांना तिनें तेथूनच लाडिकपणें दटावलें,

" कार्ट्यांनो, घरांत तरी येऊं द्या कीं त्येस्नी " म्हणत म्हणत ती पुढें झाली. तुकोबांच्या काखेंतील दाण्यांचें गांठोडें तिनें काढून घेतलें. तुकोबांनीं मुलांना ऊंस मोडून दिला. मुलें मोठ्या आनंदानें ऊंस खाऊं लागलीं. एवढ्यांत आंत जाऊन दाणे सुपांत ओतून उपरणें देण्यासाठीं जिजाई बाहेर आली. तुकोबांशीं कांहीं तरी बोलत मुलें ऊंस खात आहेत हें पाहून तिची चर्या प्रफुल्ल झाली. मुलांनीं टाकलेल्या त्या चोयट्या पाहून ती उगीचच म्हणाली,

"बाई, बाई, काय घाण करताय सारं ही घरभर चोयट्या टाकूनशान."

तुकोबाही जिजाईकडे पाहात विनोदानें म्हणाले,

" आतां मुलांच्या चोयट्यांनींच तेवढं घर घाण होतंय होय ? "

" बरं-बरं हं. समजतया मला काय म्हंतायसा त्ये. इत्तं करूनशान हायच काय आणकी ? उद्यां बगा तर खरं घर कसं आरशावानी लक्क लक्क करतुया त्यें."

फुरगटल्या चर्येनें रुसल्याचा आव आणीत, तुकोबांकडे पाहात जिजाई स्वयंपाकाला आंत निघून गेली.



अनुक्रम २९८०५
विभाग वा-वा २३
क्रमांक ११८७९

# ६

ज्ञानवानें तुकोबांना उद्योग दिला; पण त्यांच्या द्वेषानें जळणाऱ्या सालोमालोच्या अंतःकरणावर आपण हा तेलाचा शिडकावा दिला आहे, त्यामुळें ती आग किती भडकणार आहे ह्याची त्याला त्या वेळीं कल्पना आली नाहीं. एक प्रकारें आपल्या जिवावर जगणारा ज्ञानबासारखा यःकश्चित् कुळंबी तुकोबाची बाजू घेऊन आपल्या तोंडावर उर्मट उत्तरें देतो आणि आपल्या नाकावर टिच्चून आपल्याच शेतावर त्याला उद्योग देतो ह्याचा सालोमालोला अतिशय राग आला. ‘असंगाशीं संग केला म्हणजे प्राणावर बेततें’ हें ज्ञानबाला चांगलेंच दाखवावयाचें असा त्यानें त्या वेळीं आपल्या मनाशीं निश्चय केला. त्यासाठीं त्यानें नाना युक्त्या मनांत आणल्या. पण ह्या हाता करावें आणि त्यानें हातानें भरावें अशी प्रभावी ठरणारी युक्ति त्याला सुचेना. शेवटीं डोकें पिंजून पिंजून त्याला तशी एक युक्ति सुचली. आपलेंच नाक आपणच कापावयाचें पण दुसऱ्याला अपशकुन करावयाचा अशी ती युक्ति होती; तरी ती सुचल्यावर त्याला कोण आनंद झाला!

पैशासाठीं काय वाटेल तें करणारीं हीन वृत्तीचीं माणसें नेहमींच सर्व ठिकाणीं असतात. तशीं देहू गांवांतही होतीं. त्यांतलींच चार माणसें त्यानें बोलाविलीं. त्यांना आपलें काम काय आहे तें नीट समजावून सांगितलें आणि शेवटीं बजावून म्हटलें,

“तुकाराम शेत राखीत बसला नि तो भजनांत तल्लीन झाला कीं गुरं आंत घुसवा. धुव्वा उडवून द्या पिकाचा! गुरं अशीं मस्त शोधून काढा

कीं त्यांच्या एका मुसंडीसरशीं निम्मं पीक जमीनदोस्त व्हायला पाहिजे. त्या ज्ञान्याच्या जन्माचं नुकसान करा. मी तुमच्या जन्माचं कल्याण करीन."

"त्येची तुमी काळजीच करूं नगसा." त्या लोकांनीं सालोमालोला आश्वासन दिलें, "त्या ह्येन्यानें आमालावी लई म्हंजे लई तरास दिलाया! बगा तर खरं दिस मावळायच्या आंत ततं असं दिसल कीं ह्यो ह्यात हाय का माळरान हाय."

"अगदीं तसंच–तसंच व्हायला पाहिजे. जा. उद्योगाला लागाच आतां."

सालोमालोनें पैशांची एक थैली त्यांना दिली. ते लोक निघून गेले. "तुक्याला उद्योग देतोय – दे म्हणावं – भोग त्याचं फळ." असें स्वत:शींच म्हणत सालोमालोही उठून गेला.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं झुंजुमुंजु असतांनाच तुकोबा शेत-राखणीला निघाले. त्यापूर्वींच जिजाईनें उठून भाकरी कोरड्यासाचें गांठोडें तयार केलें होतें. तें त्यांच्या हातांत देतांना अभिमानाच्या प्रेमळ दृष्टीनें त्यांच्याकडे पाहात जिजाई म्हणाली,

"माज्या मंगळाईनें बुद्द दिली. छान उद्योगाला लागलासा! आतां मूठभर दान्यापायीं कुन्नाकुन्नाकडं दांत इचकाया नगत मला."

एवढ्यांत काशी–म्हाद्या जागे झाले. तेही धांवत येऊन तुकोबांना बिलगले. महाद्या म्हणाला,

"सांच्यापारीं लवकर या हं बाबा. तुमी आल्याबगार आमी भाकर न्हायी खानार."

"यतील यतील हं!" जिजाई मध्येंच म्हणाली, "कालच्या वक्ताला आणकी घ्यारभर दानं घेऊनशान यतील."

काशीनें विचारलें, "आजबी ऊंस आननार बाबा तुमी?"

....३५

तुकोबा किंचित् गंभीर होऊन म्हणाले,

" नको-आज नको. रोज रोज ज्ञानबाला संकट घालणं चांगलं नाहीं. आज मी तुम्हांला चुरमुरे आणतों हं."

"हां हां चुरमुरं आना — चुरमुरं आना" दोघेंही टाळ्या वाजवीत म्हणालीं.

मुलांचा समजूतदारपणा पाहून तुकोबाला आनंद झाला. त्यांच्या पाठी-वरून हात फिरवीत जिजाईकडे, जणूं काय तिचा निरोप घेण्यासाठींच त्यांनीं दृष्टि टाकली आणि 'जाऊं' अशी मान हलवली. जिजाईनेंही हंसत मुखानें नुसती 'हुं'कारी मान हलवली. तुकोबा आपल्या उद्योगाला निघून गेले.

ह्या सगळ्या आनंदमय प्रसंगानें तुकोबा चांगलेच भारले होते. जिजाईचें व्यावहारिक तत्त्वज्ञान त्यांना आतां अधिकाधिक पटूं लागलें होतें. परमेश्वरप्राप्तीसाठीं आश्रमधर्म सोडण्याची जरूरही नाहीं आणि नाम-चिंतनाशिवाय दुसरे श्रमही करण्याची जरूर नाहीं. एका नामचिंतनानेंच योग्यांच्या दिव्य दृष्टीला दिसणारें परिपूर्ण पण शून्याकार ब्रह्म आम्हां भोळ्या प्रपंची माणसांना सगुण रूपानें दिसतं' अशा अंतः-प्रेरणेच्या विचारलहरींवर तरंगत ते शेत राखीत बसले होते. भरघोस शेताच्या रूपानें त्यांच्यापुढें असलेलें तें परमेश्वराचें पूर्ण रूप पाहून त्यांच्या मनांतले विचार जणूं काय त्यांच्या तोंडांतून बाहेर पडत होते—

**अवघ्या दशा येणें साधती। मुख्य उपासना सगुणभक्ति।**
**प्रगटे हृदयींची मूर्ति। भावशुद्धि जाणोनियां॥**
**बीज आणि फळ हरीचें नाम। सकळ पुण्य सकळ धर्म।**
**सकळां कळांचें हें वर्म। निवारी श्रम सकळही॥**
**जेथें कीर्तन हें नामघोष। करिती निर्लज्ज हरीचे दास।**
**सकळ वोथंबले रस। तुटती पाश भवबंधाचे॥**

येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें ।
आपणचि येती तयाचे गुण । जाणें येणें खुंटे ये वस्तीचे ।।
न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळीचे धर्म ।
आणिक न करावे श्रम । एक नाम पुरे विठोबाचें ।।
वेद पुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य ।।
मुक्त आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ।।

आणि भवबंधाचे सगळे पाश तोडून योग्याचें शून्याकार परब्रह्म सगुण रूपानें पुढें ठाकण्यास लावणाऱ्या विठ्ठल नामाचा घोष त्यांनीं इतक्या तल्लीनतेनें सुरू केला कीं त्यांत ते स्वतःला विसरले, सगळ्या जगाला विसरले.

सालोमालोचे लोक त्यांच्या पाळतीवरच होते. त्यांना हेंच पाहिजे होतें. आकाश कोसळून पडलें तरी तुकोबा इकडे कीं तिकडे नुसते चळणार देखील नाहींत इतके ते विठ्ठलनामांत बेभान झाले आहेत असें दिसण्याबरोबर त्यांनीं आपला डाव साधला. निवडून आणलेलीं दहा-वीस मस्त जनावरें चाबकानें झोडपून त्यांनीं शेतांत घुसवलीं. वेफाम होऊन उधळलेल्या त्या जनावरांनीं शेतांत चहूंबाजूंनीं अशी मुसंडी मारली कीं खरो-खरीच पहिल्या सपाट्याला निम्मेंशिम्में शेत जमीनदोस्त झालें. इतकें झालें, शेतांत इतका गोंधळ माजला तरी तुकोबांना त्याची शुद्धि नव्हती. जनावरें शांत झालीं, तीं पोटभर चरलीं, त्या लोकांनीं लुटतां येईल तितकें शेत लुटलें , पत्करलेली कामगिरी चांगल्या तऱ्हेनें पार पाडल्याच्या आनंदांत ते घरीं निघून गेले, तरी तुकोबांचा विठ्ठल-नामाचा घोष अगदीं शांत आणि निर्विकार मुद्रेनें चाललाच होता.

उन्हें अद्याप चांगलीं तापलीं नव्हतीं. न्याहारी वगैरे करून ज्ञानबा आळंदीला जावयाला निघाला होता. शेत त्याच रस्त्यावर होतें. जातां-जातां शेतावर नजर टाकावी व तुकोबालाही पुन्हा एकदा बजावून जावें

असें मनाशीं ठरवून ज्ञानबा घरांतून निघाला. अगदीं ऐनवेळीं तुकोबा मिळाल्यामुळें शेतराखणीची एक मोठी काळजी दूर झाली, अशा कांहींशा समाधानाच्या विचारानें तो चालला होता. पण शेताजवळ येऊन पाहातो तों काय ? निम्में-शिम्में अधिक शेत उध्वस्त झालेलें. एक धाट उभें नाहीं कीं उभें आहे त्यावर कणीस नाहीं. शेताची ती दुर्दशा पाहून त्याच्या अंगांतलें रक्त एकदम उसळलें. संतापानें भांब्रावून जाऊन त्यानें चहूंकडे नजर टाकली. माळ्यावर बसून तुकोबा 'विठ्ठल विठ्ठल' करीत होते. त्यांना पाहून ज्ञानबाचा संताप अधिकच वाढला. खून चढल्याच्या आवेशानें तो त्यांच्याजवळ गेला. त्यांना गदगदा हालवीत तो म्हणाला, "तुक्या तुक्या, जरा डोळे उघडून बघ शेताकडं. तुला शेत राखायला ठेवला होता कीं अशी धूळदाण करायला ?" संतापानें तो इतका रुद्ध झाला होता कीं त्याला अधिक बोलतांही येईना.

तुकोबांनीं डोळे उघडले. त्यांनीं शेताकडे पाहिलें. शेताची ती स्थिति पाहून त्यांना अतिशय वाईट वाटलं. ते अगदीं लाचार होऊन दीनवाणीनें म्हणाले,

"देवा, पांडुरंगा, काय केलंस हें ! तूंच आपलं रूप विद्रूप करून घेतलंस.... "

"त्याचं रूप कसलं विद्रूप होतंय्, माझा मात्र जन्माचा विध्वंस केलास तुक्या. दहा वर्षांत आलं नव्हतं असं भरदार पीक आलं होतं. चार वर्षांची बेगमी झाली असती माझ्या संसाराची. तुक्या–तुक्या...."

एवढ्यांत सालोमालो तेथें हजर झाला. त्यानें ज्ञानबाच्या संतापाला आणखी डिवचलं,

"काय ज्ञानबा, मीं म्हटलं नव्हतं तुम्हांला ! ह्या मूर्खाच्या नादीं लागलांत आणि शेताची नासाडी करून घेतलीत. मी मात्र माझा खंड तुमच्या बापाला सुद्धा सोडणार नाहीं."

" आणि मी तरी कुठें ह्याच्या बापाला सोडणार आहें ? मी कांहीं असा साधाभोळा साधु नाहीं गप्प बसायला. "

" अहो काय घेणार त्याच्याकडून तुम्ही ? सबंध घर धुऊन घेतलं तरी दोन शेर दाण्यांची सुद्धा किंमत मिळणार नाहीं. " सालोमालोनें हंसत हंसत पुन्हा एक टोमणा दिला.

ज्ञानबानेंही तितक्याच तत्परतेनें उत्तर दिलें, " पण घर तरी आहे कीं नाहीं ? आतां पाटलाला बोलावून आणतों, त्याला सगळं सांगतों आणि नुकसानभरपाईबद्दल त्याचं घर लिहून घेतों. "

ज्ञानबाच्या निरोपाबरोबर पाटील आले. त्यांनीं नासाडी झालेलें शेत पाहिलें. त्यांना फार हळहळ वाटली. ज्ञानबाप्रमाणेंच तेही तुकारामबुवा-बद्दल सहानुभूति बाळगणारे होते. पण करणार काय ? त्यांनीं त्यांतल्या-त्यांत तडजोड केली आणि कर्जखतासारखा एक कागद लिहिला. तो तुकोबांना वाचण्यास देतांना पाटील म्हणाले,

" तुकोबा , आतां हें घर तुमच्याकडेच राह्यचं कीं दुसऱ्याकडे जायचं हें तुमच्या नशिबावर अवलंबून आहे. ह्या शेतांत दरसाल दोन खंडी दानं पिकत्यात. राह्यल्याल्या शेतांत तित्तं दानं झालं तर घर तुमचं. न्हाईतर घर इकूनशान दोन खंडी दान्याची भरपाई कराया व्होवी. आहे कबूल ? "

तुकोबांनीं तो कागद वाचला आणि म्हटलें, " आहे कबूल. चूकच झाली आहे माझी. "

" मग करा तर सही. " पाटील म्हणाले.

तुकोबांनीं सही केली. सालोमालोनीं त्यावर साक्ष घातली आणि शेवटीं आपल्या हीन वृत्तीला शोभेल असा तुकोबांना टोमणा मारला,

" तुकोबा, उद्योग केलांत आणि घरापरी घर घालवून बसलांत. थाटा आतां आपला संसार एखाद्या झाडाखालीं. "

# ७

घडलेल्या ह्या एकंदर प्रकारानें, विशेषत: आपल्या हातून ज्ञानबाच्या झालेल्या नुकसानीनें तुकोबांचें मन कांहींसें त्रस्त आणि बेचैन झालें होतें. तें शांत करण्यासाठीं ते नेहमींप्रमाणें भामनाथावर गेले. "आपण करतों हें चूक करतों काय? आजच्या प्रसंगानें मीं काय करावं असं देवाच्या मनांत आहे? तुक्या, तूं संसाराला योग्य नाहींस असंच त्यानें मला आज सांगितलं कीं काय?" असल्या विचारांनीं त्यांचा उडालेला गोंधळ लवकर शांत झाला नाहीं. शेवटीं त्यांनीं ठरविलें,

"भ्याडासारखं संसाराला भ्यायचं नाहीं. संसार करायचा आणि त्यांतलीं दु:खं स्वत:च भोगायला तयार राहायचं. त्यांतनं पांडुरंग काय करील तें करील."

**आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ।।**
**मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर ते बापुडे काय रंके ।।**
**भयाचिये पोटीं दु:खाचिया रासी । शरण देवासी जातां भले ।।**
**तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ।।**

मनाचा असा निश्चय करून तुकारामबुवा निराळ्याच धैर्यानें घरीं येण्यास निघाले.

कालपासून, म्हणजे तुकारामबुवा खरोखरीच संसार करूं लागल्या-पासून संसारदक्ष पत्नीचें खरें वारें जिजाईच्या अंगांत संचरलें होतें. संसार वाहणाऱ्या पुरुषाला ज्या ज्या कृतीनें समाधान मिळेल तें तें करण्यांत ती तत्पर झाली होती. घरांत कांहींशा अस्ताव्यस्त पडलेल्या पसाऱ्याकडे पाहात

तुकोबा काल सहज म्हणाले होते, " आतां मुलांच्या चोयट्यांनींच तेवढं घर घाण होतंय होय. " त्याच वेळीं तिनें टरविलें होतें ' उद्यां तुकोबा कामावरून यायच्या आंत घरांतल्या व्यवस्थेकडे बघूनच त्यांचें पोट भरेल असं करायचं. ' आणि आज तिनें तसें केलेंही होतें. सगळें घर लिंपून, आढ्याचीं-कानाकोपऱ्यांतलीं जळमटं काढून, भिंती-जमिनी सारवून, सामान नीटनेटकें ठेवून सगळें घर झकपक केलें होतें. तुकोबा यावयाच्या वेळेला तिनें पुन्हा एकदा घराची पाहाणी केली. तिला समाधान झालें. ती समाधानाच्या प्रफुल्ल मुद्रेनें मुलांना म्हणाली,

" काश्ये, अर म्हाद्या, आतां इत्तयांत येत्याल बगा त्ये ! अदुगर तुमी कायबी बोलूं नगासा हं ! त्येस्नीच अदुगर बगूं द्या. घर बगुनशान त्ये म्हणत्याल, ' आवले, तूं कित्ती शानी हायस गं ! घर कसं अगदीं सत्राच सवाच केलंयास. जनूं काय राजवाडाच.' आनि मग माज्या अंगावर मूठभर मांस चढल. "

एवढ्यांत तुकोबा येत असलेले मुलांना दिसले. त्यावरोबर मुलें टाळ्या पिटीत म्हणालीं,

" आई, आई, बाबा आले बग.

तिनेंही तुकोबांना पाहिलें. ती पुन्हा मुलांना म्हणाली.

" गपा, बोलूं नगासा, लपा त्या दाराआड " आणि ती सुद्धा मुलांप्रमाणें दाराआड लपून तुकोबा घरांत येण्याची उत्सुकतेनें वाट पाहूं लागली.

तुकोबा गंभीर मुद्रेनें " महादेव, अरे महादेव " अशा हांका मारीत आले. जिजाईनें महादेवाला हळूच विचारलें,

" काय दानं विनं आणल्यालं दिसत्यात काय ? "

महादेवानें तुकोबांकडे बघून खुणेनेंच ' नाहीं ' म्हणून सांगितलें. तुकोबांची कांहींशी गंभीर चर्या पाहून जिजाईलाच राहात्रेना. ती पुढें होऊन त्यांना धीराच्या प्रेमळ शब्दांतच म्हणाली,

" ग्येनबानं दानं दिलं न्हाइती जनूं? एकदम देनार हाय व्हय? दील दील त्यो. पन बगितलसा काय, आज कसं लक लक करून टाकलंय आपलं घर?"

" घर? आपलं?" तुकारामाच्या स्वरांत उदासीनता स्पष्ट दिसली.

" म्हणजे? आपलं न्हाई तर कुना दुसऱ्याचं हाय व्हव?" जिजाई हंसत हंसत म्हणाली.

" होय, तें आपलं नाहीं. तें आतां पांडुरंगाचं आहे."

पुन्हा देखील तुकोबांच्या स्वरांत उदासीनता चांगलीच स्पष्ट दिसली. त्यांची चर्याही उदास होती. कालचा उत्साह, कालचा आनंद आज त्यांच्या चर्येवर मुळींच नव्हता आणि 'आतां तें पांडुरंगाचं आहे' असें म्हणतांना त्यांनीं एक सुस्काराही टाकला तें पाहून जिजाईला विपरीत वाटलें. तिनें कांहींशा तीक्ष्ण स्वरांत विचारलें,

" कुनाचं म्हंतासा?"

तुकोबांनीं पहिल्याप्रमाणेंच शांतपणें उत्तर दिलें,

"तें पांडुरंगानें आपल्याला दिलं आणि तोच आतां तें काढून घेतो आहे."

" म्हंजे म्हंतासा तरी काय?"

" अग, मी शेत राखीत असतांना गुरांनीं शेताची नासाडी केली. त्याच्या नुकसानभरपाईसाठीं ज्ञानबाला मीं हें घर लिहून दिलं. पांडुरंगाची इच्छा! आपल्या हातून झालेलं नुकसान आपल्याला नको का भरून द्यायला?"

आतां मात्र जिजाईला राहावेना. वैतागानें कपाळावर हात मारून घेत ती तुकोबांवर खेकसली,

" पोरास्नीं हक्काची सावट व्हती, ती बी गमावलीसा. आतां काय तुमच्या म्होरं कपाळ फाडून घ्येयाचं?"

" पांडुरंग–पांडुरंग–सगळं त्याच्याच इच्छेनें चाललं आहे. तोच ह्यांची काळजी घ्यायला समर्थ आहे." तुकोबांची शांति मुळींच ढळली नाहीं.

# ८

ज्ञानबाकडे असलेलें सालोमालोचें शेत कापून मळणी करावयाला आतां फार दिवस राहिले नव्हते. आठ-दहा दिवसांतच मळणी होऊन धान्याचा ढीग पडला. धान्य मोजून खंड घ्यावयाचा आजचा दिवस होता. आजच्या मापावर तुकोबांचें घर जातें कीं राहातें हें अवलंबून होतें, म्हणून माप पाटलांच्या देखत व्हावयाचें होतें. पाटील शेतावर हजर होते. ज्ञानबाही हजर होता. ‘तुकारामाचं घर आज विकलं जाणार–तें आपणच विकत घेणार–आणि घर घेतलं कीं तुकारामाला घरांतून हाकलून देणार’ असें मनाशीं ठरवून सालोमालोही तेथें आला होता. धान्याचा दिसणारा ढीग फारसा मोठा दिसत नव्हता. तो पाहून सालोमालो मनांतल्या मनांत खूष झाला होता.

पाटील येण्याबरोबर मापाला सुरुवात झाली. माप्या धान्य मोजून पोत्यांत टाकूं लागला. खळ्याच्या दुसऱ्या बाजूला पोत्यांची थडी चढूं लागली. दोन खंडी दाणे केव्हांच भरले होते. त्यावर धान्याचीं पोतीं चढूं लागलीं, तेव्हां ज्ञानबाला आणि पाटलांना समाधान वाटलें. तुकोबांचें घर वांचलें, म्हणून दोघांच्याही चर्येवर आनंदाची छटा उमटली. दोघांनींही एकमेकां-कडे पाहून मूकपणेंच परस्परांनीं परस्परांना आपला भाव व्यक्त केला. सालोमालोला मात्र वाईट वाटलें. तुकोबांचें घर घेऊन त्यांना हाकलून लावण्याचा आपला डाव फसल्यामुळें त्याची चर्या खेटरानें मारल्यासारखी झाली. पण पुढें पुढें ती पुन्हा खुलूं लागली. त्याला वाटूं लागलें, ‘आतां धान्य जितकं जास्ती होईल तितकं आपलंच आहे. घर नाहीं तर नाहीं धान्य तरी भरपूर मिळतं आहे.’

धान्यानें भरलेल्या पोत्यांची थडी अधिक-अधिकच चढूं लागली आणि धान्याची रास मात्र आहे तशीच आहे, हें पाहून ज्ञानबा मात्र आश्चर्यानें थक्क झाला. मध्येंच त्याच्या तोंडून उद्गारही निघाले,

"अरे, आहे काय हें? किती मोजले तरी रास आहे तशीच आहे! किती झाले दाणे?"

"ईस खंडी झालं. अजून पांच सात मण भरत्याल." माप्यानें उत्तर दिलें.

"वीस खंडी? इतकी नासधूस होऊन वीस खंडी? नीट मोजलेस?"

पाटील मध्येंच म्हणाले, "ही बगा कीं शीग लागलीया. तुमचं भाग्य मोठं ज्ञानबा, धरित्रीनें तुमाला धा सालचं दानं एकदम दिलं. हें काय ज्ञानबा, आतां कसला इचार करतायसा?"

ज्ञानबा खरोखरी विचारांतच गढून गेला होता. तुकोबांवर पांडुरंगाची कृपा आहे अशी त्याची खात्री झाली. त्यांच्यासारख्या साधुपुरुषाला—पांडुरंगाच्या भक्ताला रागाच्या भरांत आपण वाटेल तें बोललों, त्याचा आश्रय काढून घेतला, ह्याबद्दल त्याला वाईट वाटूं लागलें. तो अपराधी स्वरांत म्हणाला,

"मीं फार मोठा अन्याय केला पाटीलबुवा. जनावरांनीं शेत खाल्ल्यावर मी तुकोबाला वाटेल तें बोललों, त्याचं घर सुद्धा लिहून घेतलं. छे छे, मीं फार मोठा अन्याय केला देवाचा. मी फक्त दोन खंडीच दाणे घेणार. बाकीचे सगळे तुकारामबोवांचेच आहेत. ते मी त्यांचे त्यांना देणार."

ज्ञानबांचा हा निश्चय ऐकून पाटलांना त्याच्या मोठेपणाचें कौतुक वाटलें. त्यांनीं त्याच्या पाठीवर थाप मारीत म्हटलें,

"शाबास—शाबास ज्ञानबा—तुकारामासारकीं मानसं पिरथीवर लई इरळा."

दोघांचेंही तें बोलणें ऐकून सालोमालो चांगलाच चिडला. तो आवेशानें म्हणाला,

"अहो, शेत माझं आहे. तुम्हांला शेत खंडानें दिलं, म्हणून तुम्ही कांहीं त्याचे मालक नाहीं झालांत. त्या ऐद्दी तुक्याच्या घरीं दाणे भरणारे तुम्हीं कोण उपटसुंभ?"

ज्ञानबानेंहि तशाच कणखर स्वरांत त्यांना उत्तर दिलें, "आपला जो खंड ठरला आहे तो आपल्या घरीं चालत येईल. बाकीच्या धान्याची विल्हेवाट करायला माझा मी मुखत्यार आहें."

आपल्या लोकांना उद्देशून तो पुढें म्हणाला, "चलारे भरा गाड्या आणि घेऊन चला तुकारामबोवांच्या घरीं."

सालोमालो अधिकच चिडून ज्ञानबाला वेडावीत म्हणाला, "तर तर "भ ऽ रा ऽ रे गाड्या–तोंडानें नुसती बडबड करायला काय जातंय? बघतो कीं त्या तुक्याच्या घरीं कशा गाड्या जाताहेत त्या! खबरदार कुणी हात लावाल तर."

लागलीच पाटलांनींही सालोमालोचा अधिकारानें कान पिळला. "अहो, ही काय बेबंदशाही नाहीं. सगळं दानं तुमचं न्हवत. खंडावर तेवढा तुमचा हक्क आहे. तुकोबाचं घर तुम्हीं लिहून घेतलं नसतं, तर तुमच्या म्हणण्यांत कांहीं अरुथ व्हता. शेतांत ढोरं घालून कुणीं बिचाऱ्यांनीं तुकोबांचं कल्याणच केळं म्हणायचं."

शेवटलं वाक्य उच्चारतांना पाटलांनीं सालोमालोकडे अशा कांहीं मुद्रेनें पाहिलें कीं सालोमालो एकदम म्हणाला,

"म्हणजे, आम्ही–आही ढोरं शेतांत घातलीं असं तुमचं म्हणणं?"

त्यावर पाटील आणि ज्ञानबा एकमेकांकडे पाहून नुसते हंसले. सालोमालो संतापानें पाय आपटीत तेथून निघून गेला.

ज्ञानबानें सालोमालोचा खंड काढला, आपलाही तितकाच वाटा बाजूला काढला आणि बाकीच्या धान्याच्या गाड्या भरून तो स्वत: तुकोबांच्या घरीं गेला. पाण्याला निघालेली जिजाई ह्याच वेळीं दारांत आली होती. आज कित्येक दिवसांनीं विशेषत: शेताची मळणी झाल्यावर ज्ञानबा दारांत

दिसला तेव्हां तिला सहजच वाटलें, दाणे कमी भरले आणि तोटा आलेल्या दाण्यांची भरपाई करण्यासाठीं घराचा लिलांव करण्यास तो आला असावा. ती कांहींशा कठोर स्वरांतच त्याला म्हणाली,

"कोन ज्ञानबा? आमास्नी घराभायीर काढाया आलास व्हय?"

तिला अधिक बोलूं न देतां ज्ञानबा अगदीं गरिबीच्या मऊ स्वरांत म्हणाला,

"नाहीं. तुकारामबुवांच्या पुण्याईनें माझ्या शेतांत यंदा जास्त पीक आलं आहे, तें मीं तुम्हांला द्यायला आणलं आहे. त्या पाहा गाड्या भरून आणल्या आहेत."

"म्हंजे—त्या सगळ्या गाड्या आमच्या?" जिजाईनें आश्चर्यानें विचारलें.

"होय. ह्या सगळ्या गाड्या तुमच्या!"

"खरं म्हंतासा ज्ञानबा!"

"होय. खरं, अगदीं खरं—पांडुरंगा शपथ. त्या सगळ्या गाड्या तुमच्या."

"आई मंगळाई! अग काश्ये, अर म्हाद्या, दानं उतरूनशान घ्या. चला—चला." जिजाईचा आनंद गगनांत मावेना.

त्या भरलेल्या गाड्या पाहून काशी–महाद्याला देखील आनंद झाला. ते उड्या मारीत इकडे तिकडे लुडबुडूं लागले. गाडीवान तुकारामाच्या सोप्यावर पोत्यांच्या थडी लावीत होते. आंत मागच्या बाजूला लिहीत बसलेल्या तुकोबांना त्याची दादही नव्हती. शेवटीं महाद्याच आंत गेला. त्यानें त्यांच्या पाठीवर पडून त्यांना गदगदा हालवीत ही आनंदाची बातमी सांगितली. त्यानें त्यांना त्या थडी बघावयाला जवळजवळ ओढीतच बाहेर आणलें. त्या थडी बघून तुकोबांना आनंदाच्या ऐवजीं विषादच वाटला. त्यांनीं ज्ञानबाला म्हटलें देखील,

"हें काय ज्ञानबा?"

ज्ञानबानें एकदम त्यांच्या पायांवर पडून पश्चात्तापाच्या स्वरांत म्हटलें, " मोठा अपराध केला मीं तुमचा. क्षमा करा. तुमच्या कृपेनें माझ्या शेतांत जास्त झालेलं हें सारं पीक तुमचंच आहे. "

" असं कसं होईल ज्ञानबा ? तुमच्या शेतांत आलेलं पीक तुमचं ! छे: तें मी नाहीं घेणार. न्या बघूं तें परत." तुकोबांनीं ज्ञानबाला निक्षून सांगितलें.

ज्ञानबानेंही तितकेंच निक्षून सांगितलें, " सालेमालोचा ठरलेला खंड मीं पुरेपूर दिला आहे. माझाही तितकाच वांटा मीं घेतला आहे. पांडुरंगाच्या कृपेनें हें जास्त झालेलं धान्य तुमच्या वांट्याचं आहे. तें मीं मुळींच परत नेणार नाहीं. "

" तें तुम्हांला न्यायचं नसलं तर अन्नअन्न करीत फिरणाऱ्या भिकाऱ्यांना किंवा दुसऱ्यांना वांटा, पण तें माझ्या घरांत नको. त्यासाठीं मीं कष्ट केले नाहींत. मीं मिळवलं नाहीं त्याच्यावर माझा हक्क नाहीं–तें माझं नाहीं. " तुकोबा प्रत्येक शब्दावर जोर देऊन निश्चयानें सांगत होते.

" मला तें हें कांहीं माहीत नाहीं. हे दाणे तुमचे आहेत. तुमच्या मालकीचे दाणे भिकाऱ्यांना वांटणारा मीं कोण ? " ज्ञानबानेंही तितक्याच निश्चयानें सांगितलें. तुकोबाशीं वाद घालण्यासाठीं मग तो तेथें राहिलाच नाहीं. त्यांना नमस्कार करून " येतों मी " असें म्हणत तो निघूनच गेला.

तुकोबा विचारांत पडले. क्षणभर विचार करून अन्नान्न झालेल्या गोर-गरिबांना, अपंगांना आणि भिकाऱ्यांना स्वत:च तें धान्य वांटण्याचा त्यांनीं निश्चय केला. ते तसेच बाहेर गेले आणि त्यांनीं सगळ्यांना सांगितलें,

" चला माझ्या घरीं. तुमच्यासाठीं पांडुरंगानें माझ्या घरीं धान्य आणून ठेवलं आहे. तुम्हांला पाहिजे तितकं घ्या. "

मग काय ? क्षणाचा अवकाश ! तुकोबांच्या घरावर गोरगरिबांची आणि अपंग भिकाऱ्यांची नुसती झुंबड उडाली. ज्याला जितकें पाहिजे तितकें तो धान्य घेऊं लागलाच, पण तुकोबाही स्वत: धान्य वाटूं लागले. ते वांटतां

वांटतां लोकांना सांगत होते, लोकही त्यांचाच चरण पुन्हा म्हणून त्यांना साथ देत होते.

**तुकाराम:** **क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ॥**
**धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥**

**भिक्षेकरी:** ( जातां-जातां )
**धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥**

**तुकाराम:** **सर्वां भूतां द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ॥**

**भिक्षेकरी:** **सर्वां भूतां द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ॥**

**तुकाराम:** **पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥**

**भिक्षेकरी:** **पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥**

**तुकाराम:** **फुकाचें तें लुटा सार । व्हारे अमर सदैव ॥**

**भिक्षेकरी:** **फुकाचें तें लुटा सार । व्हारे अमर सदैव ॥**

**तुकाराम:** **बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल ।**
**करावा विठ्ठल । जीवभाव ॥**

**भिक्षेकरी:** **बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल ।**
**करावा विठ्ठल । जीवभाव ॥**

सगळे लोक आपआपल्यापरी आनंदांत दंग होते. जन्मांत मिळालें नाहीं इतकें धान्य आज मिळालें म्हणून गोर-गरीब आणि भिकारी आनंदांत होते. परमेश्वरानें धान्यरूपानें उभा केलेला मोहाचा लोभनीय डोंगर आपण नाहींसा करतोंय–अधिक अधिक परमेश्वराजवळ जातोंय–म्हणून तुकोबांना अपरिमित आनंद झाला होता. आतां चार-पांच वर्षें तरी दाण्यांची ददात नाहीं असें समजून त्या थडींतल्या पोत्यांतले दाणे घेऊन मंगळाईवरचें गाणें म्हणत दाणे दळण्यांत जिजाई सगळें जग विसरून गेली होती. दळावयाला घेतलेले तिचे दाणे संपले. रोजच्यापेक्षां आज तिनें किती तरी दाणे अधिक दळले होते, तरी तिचा उत्साह कमी झाला नव्हता.

आणखी दळून ठेवण्यासाठीं दाणे घेण्यास ती बाहेर आली. पाहाते तों काय? पोत्यांची सगळी थडी नाहींशी झालेली! पोतें अर्धें पोतें दाणे होते, ते सुद्धा घेण्यासाठीं ४-५ भिकारी पदर पसरून दारांत उभे होते आणि तुकोबा त्यांच्या पदरांत दाणे घालताहेत असें तिला दिसलें. तिचा संताप अनावर झाला. तिनें तुकोबांकडे एक जळजळीत दृष्टि टाकिली. पण तिकडे लक्ष न देतां तुकोबा त्या भिकाऱ्यांना दाणे घालण्यास निघाले हें पाहातांच ती त्या भिकाऱ्यांच्याच अंगावर धावून ओरडली.

"अरं मेल्यांनो, जोकाईच्या रेड्यावानी माजलायसा आयतं गिळूनशान्, हतं काय तुमच्या बानं आनून ठेवल्याती दानं व्हय र!"

जिजाईचा तो अवतार बघून भिकारी पळूं लागले. त्यांना चांगली अद्दल घडविण्यासाठीं जिजाईनेंही त्यांचा पाठलाग केला. ते काय तिला ऐकणार? बराच पाठलाग करून भिकारी आतां सापडत नाहींत अशी खात्री झाल्यावर ती मध्येंच थांबली आणि त्यांना उद्देशून तेथूनच ती म्हणाली

"हात् तुजी, पळा, पळा रांडल्याकांनो, आतां पुना माज्या घराला या तरी, न्हायी पाय मोडलं तर जिजाईच न्हवं मी!"

असें म्हणून तिनें पदरानें कपाळावरचा घाम पुसला आणि हळुहळू ती घरीं परतली. अंगणांत येऊन पाहाते तों काय, दुसरा एक भिकारी उभाच आहे आणि दाणे संपले म्हणून तुकोबा दळलेलें पीठ त्याच्या कटोऱ्यांत ओतताहेत. तें पाहून जिजाईचा संताप पुन्हा वाढला. ती धावतच आली.

"साऱ्या गांवाला काय आग लागली व्हती व्हय र! माज्याच घराला भीक मागाया आलास त्यो!"

असें म्हणत तिनें त्या भिकाऱ्याच्या कटोऱ्यावर हात मारला. सगळें पीठ खालीं सांडलें. तें पाहून तुकोबा म्हणाले,

"काय हें आवले? तुलाही नाहीं आणि त्यालाही नाहीं."

"ढळां ढळां रडा त्येच्यापायीं! आतां तुमच्याम्होरं काय कप्पाळ फोडून घेऊं का काय? इक्तं दान बी दिलंसा, अन् दळल्यालं पीट बी

दिलंसा. आतां तुमच्या अन् पोराच्या म्होरं काय माजीं हाडं घालूं का तुमचीं हाडं घालूं !"

शेवटलें वाक्य म्हणतांना तीं वैतागानें अगदीं रडकुंडीला आली. त्या भरांत तुकोबांना गदगदां हलवीतच तिनें शेवटलें वाक्य उच्चारलें.

तुकोबा अगदीं शांतपणें हसत म्हणाले,

**"खवळली पिसी । हाता झोंबे जैसी लासी ॥"**

"उलट मीच लासी व्हय ? खरं हाय मेल्यानुं. भुकेच्या वकताला आयता लेंदा आनूनशान घालतुंया न मी ?"

"इतका अभिमान धरूं नको आणि लोभ्यासारखा हव्यासही करूं नको. आवले, ज्याच्या त्याच्या संचिताप्रमाणें पांडुरंग सगळ्यांची यथायोग्य काळजी घेतो." तुकोबा पहिल्यापेक्षांही शांत आणि गंभीर स्वरानें म्हणाले.

जिजाबाई अधिकच चिडून त्यांना वेडावीत म्हणाली,

"आऽहाऽहाऽहा संचितापरमानं प्यांडुरंग यवस्ता करतुया ! इक्तं करुनशान मीच लोवी व्हय ? आई मंगळाई, कुठल्या जल्माचीं पातकं डुबीं केलींस अन् मला ह्या येड्याच्या गळ्यांत बांदलीस ? तुमचं इक्तं हाय तर मला वी नग तुमचा परपंच ! तुमी, तुमचं संचित, तुमचा त्यो काळ्या अन् तुमचीं तीं प्वारं काय वाटल तें करा, पन मी काय आतां हतं पानीबी पिनार न्हाई."

असें म्हणत जिजाई खरोखरीच बाहेर निघून गेली. काशी आणि महादा "आई–आई" करीत तिच्या पाठीं गेलीं. पण तिनें त्यांना तुकोबांच्या अंगावर ढकलून दिलें. तिला आतां त्या वैतागाच्या भरांत कोणाची माया राहिली नाहीं. ती गेली ती गेलीच. मुलें बिचारीं तुकोबांजवळ येऊन रडूं लागलीं. तुकोबा त्यांच्या अंगावरून हात फिरवीत त्यांची समजूत काढूं लागले.

"अरे तुम्हांला सोडून ती कुठें जायची नाहीं. ती माझ्यावर रागावली आहे. आतां इतक्यांत येईल ती."

वाचनालय
ना. क्र. ... दि. ...
वि. ... ग. ...

आज सगळा देहू गांव तुकोबा-तुकोबा म्हणत होता. ज्यांना प्रत्यक्ष धान्य मिळालें होतें, ते अपंग, भिकारी, गरीब, तुकोबांचे गुण गात रस्त्यांतून जात होते, तर ज्यांना धान्य मिळालें नव्हतें असे मध्यमवर्गीय सुखवस्तु सद्‌गृहस्थ जो भेटेल त्याच्याजवळ तुकोबांच्या औदार्याची प्रशंसा करीत होते. ह्यानें त्याच्याजवळ बोलावें, त्यानें त्याच्याजवळ बोलावें, अशा तऱ्हेनें आज पुरुष, बायका, मुलें सगळ्या, सगळ्यांच्या तोंडीं " तुकोबा-तुकोबा " झालें होतें.

ह्याला दोन अपवाद होते. पहिला अपवाद सालोमालोचा. सकाळीं ज्ञानबाच्या खडसावून सांगण्यानें त्याला राग आला होता आणि पाटलांच्या अर्थपूर्ण टोमण्यानें तो भडकला होता. आतां लोकांनीं चालवलेल्या तुकोबांच्या 'उदो उदो'नें तर त्याच्या अंगाची नुसती लाही उडत होती. त्या दिवशीं तो घराच्या बाहेर पडला देखील नाहीं.

दुसरा अपवाद मंबाजीबुवांचा ! मंबाजीबुवा हा चिंचवडचा ब्राह्मण. तो आपल्याला ब्रह्मवेत्ता साधु म्हणवून घेत असे. त्याचा साधुबुवा म्हणून जमही बसत चालला होता. पण तुकोबांच्या अभंगांतील साधुपुरुषाचे खरे गुण लोकांच्या प्रत्ययाला येऊं लागले तसें मंबाजीचें ढोंग बाहेर पडूं लागलें. आपल्यावरची श्रद्धा उडून लोक तुकोबाच्या नादीं लागूं लागले हें लक्षांत येतांच मंबाजीबुवाही त्यांचा द्वेष करूं लागला होता.

परमात्मपदाची प्राप्ति करून घेण्यास मनुष्याला काम-क्रोधादि शत्रूंना जिंकावें लागतें. त्या पदाची प्राप्ति करून घेण्याची खरोखरींच तळमळ असणारे तुकोबांसारखे पुरुष त्या शत्रूंना जिंकण्याची आपल्याकडून

पराकाष्ठा करीत असतात. पण त्यांत आपली प्रगति किती झाली आहे हें, तसे प्रसंग आल्याखेरीज त्यांनाही समजत नाहीं आणि लोकांनाही समजत नाहीं. तुकोबांसारख्या साधुपुरुषावर असे प्रसंग आणण्यास त्यांच्या द्वेष्ट्या निंदकांखेरीज कोणी धजत नाहीं. असे द्वेषी निंदक असणें हें तुकोबांसारखे साधुपुरुष आपलें भाग्यच समजतात.

> **निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी । रजकाहुनि भला । परि सर्व गुणें आगळा ।। १ ।। ने घे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरी देखा । करीतसें साधका । शुद्ध सरते तिहीं लोकीं ।।२।। मुख संवदणी सांगाते । अवघे साटविले तेथें । जिव्हा साबण निरुते । दोष काढी जन्माचे ।। ३ ।।**

अशा परउपकारी ' निंदकाचें घर ' तुकोबांच्या अगदीं शेजारींच होतें. तुकोबांच्या विठ्ठलमंदिराशेजारीं मंबाजीचा वाडा होता. त्यामुळें मंबाजीला तुकोबांची वारंवार परीक्षा घेतां येत होती. तुकोबांनीं क्रोधादि षड्रिपूंचें दमन करून दया, क्षमा, शांति किती संपादन केली आहे ह्याची मंबाजीनें पूर्वीं अनेकवार परीक्षा घेतली होती. त्यांत तुकोबा चांगल्या तऱ्हेनें उतरले होते. तुकोबा परीक्षेंत उतरले आणि लोकांनीं त्यांची वाहवा केली कीं मंबाजीबुवांच्या तळव्याची आग मस्तकाला जाई. आज तुकोबांची वाहवा करण्याची लोकांनीं परमावधि केली होती तशीच मंबाजी-बुवांच्या रागाचीही आज परमावधि झाली होती. लोकांच्या मनांतून तुकोबा अजिबात उतरावेत, एवढेंच नव्हे तर ते पक्के ढोंगी आहेत असें सगळ्या देहू गांवाला पटवावें, म्हणून त्यांनीं आज एक अजब युक्ति काढली होती. जणूं काय तुकोबांनीं षड्रिपु किती जिंकले आहेत ह्याची कठीण कसोटी बघण्यासाठींच पांडुरंगानें मंबाजीला तसें करण्याची बुद्धि दिली होती.

# १०

प्रहरभर रात्र झाली होती, पण तुकोबांच्या कल्पनेप्रमाणें मुलांच्या ओढीनें जिजाई अद्याप घरीं आली नव्हती. तरी ती येणार ही मात्र त्यांची खात्री होती. मुलें बिचारीं तिची सारखी वाट पाहात होतीं. अखेरीस तीं अगदीं कैंगटीला आलीं. तुकोबांच्या मांडीवर पेंगतां पेंगतां महाद्या म्हणाला,

" मला झोंप लागल्यावर आई आली तर लागलीच उठवा हं! "

" आणि मला सुद्धा उठवा बरं का बाबा! " काशीनेंही सांगितलें.

मुलांना लवकरच गाढ झोंप लागली. तुकोबा पांडुरंगाचें नांव घेण्यांत इतके तल्लीन झाले कीं त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें,

**विषयीं विसर पडला निःशेष। अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥**
**माझी मज झाली अनावर वाचा। छंद या नामाचा घेतलासे ॥**
**तुका म्हणे गंगा सागर संगमीं। अवघ्या झाल्या ऊर्मि एकमय ॥**

त्यांच्या मनाची झालेली ही स्थिति ते अभंगवाणीनें लिहून काढूं लागले. त्यांचें लिहिणें संपतां संपतां त्यांना कांहीं मधुर आलाप ऐकूं येऊं लागले.

**" कशी मी जाऊं वृंदावना। मुरली वाजवितो कान्हा॥ ध्रु० ॥**
**पहिले तीरीं हरि वाजवी मुरली। नदी भरली यमुना। कशी ॥ १ ॥**
**कांसे पीतांबर केशरी टिळक। कुंडल शोभे काना। कशी॥ २॥**
**काय करूं कोणा सांगूं। नामाची सांगड आणा। कशी ॥ ३ ॥**
**नंदाच्या हरीनें कौतुक केलें। जाणें अंतरींच्या खुणा। कशी ॥४॥**
**एकाजनार्दनी मनीं म्हणा। देव माहात्म्य नकळे कोणा। कशी॥५॥**

गोड, मंजुळ आलापांत गायिलेल्या त्या कृष्णाच्या लीला ऐकून तुकोबाही तल्लीन होऊं लागले. 'नामाची सांगड आणा' ह्या चरणावर तर ते उठलेच आणि ज्या बाजूनें आवाज ऐकूं येत होता तिकडे त्यांचीं पावलें आपोआपच वळलीं.

ते आलाप घेणारी देहू गांवांतील सुंदरा नांवाची एक वेश्या होती. ज्याचा तुम्ही आज 'उदो उदो' करतां आहांत तो तुक्या पक्का भोंदू आहे, पापी आहे, हें लोकांना दाखवून देण्यासाठीं मंबाजीनें ह्या वेश्येला तुकोबांचें शील भ्रष्ट करण्याकरतां पाठवलें होतें. त्या वेश्येनेंही फुशारकी मारली होती,

"साधूंचा भोंदूपणा बाहेर काढण्याचीं कामं आम्हीं बायकांनींच करावींत. विश्वामित्राला सुद्धा आम्ही बायकांनींच कुत्रं करून आमच्या मागें आणलं, तिथें तुकारामासारख्या वाणगटाची काय कथा ?"

अशी अगदीं प्रतिज्ञा करून ती वेश्या तुकोबांच्या घरीं आली होती. त्यांना मोहित करण्यासाठीं तिनें विचार करून काढलेली युक्तिही पूर्णपणें सफल झाली होती. तुकोबा आपल्याकडे येत आहेत असें दिसतांच ती अधिकच उत्तान हावभाव करीत तें गाणें निरनिराळ्या तऱ्हेनें आळवूं लागली. तुकोबाही त्या आळवणींत तल्लीन होऊन चिपळ्या वाजवीत म्हणूं लागले,

**"नंदाच्या हरीनें कौतुक केलें। जाणें अंतरींच्या खुणा"**

तुकोबा आतां सुंदराबरोबर नुसतें गाणेंच म्हणूं लागले नाहींत, तर ते तिच्याबरोबर नाचूंही लागले. सुंदरानें आपलें गाणें संपवलें, नाचही थांबवला, तरी तुकोबा आपल्या तंद्रींतच होते. आलाप बंद झाल्यावर क्षणभरानें त्यांची तंद्री उतरली. ते सुंदराकडे हसतमुखानें पाहात कृतज्ञतेच्या स्वरानें म्हणाले,

"मी अगदीं भान विसरून गेलों होतों हं तुमच्या गाण्यानें. बरोबरच आहे, असल्या सुंदर कंठांतून निघणारा मधुर स्वर ऐकून कोण बरं मुग्ध होणार नाहीं ?"

“ माझं गाणं आपल्याला आवडलं वाटतं ? आणि मी ? ” सुंदरा लाडिकपणें म्हणाली.

“ हो. हो. आपण खरोखरच फार सुंदर आहांत. असलं हें सात्त्विक सौंदर्य पाहून कुणाला बरं आनंद होणार नाहीं ? ” तुकोबांनीं सरळ भावानें उत्तर दिलें.

“ खरंच माझ्याबद्दल आपल्याला इतकं प्रेम वाटतं ? आपल्या हातांतल्या ह्या चिपळ्या किती चांगल्या आहेत ! ” असें म्हणत ती तुकोबांजवळ गेली. तिनें त्यांच्या हातांतल्या चिपळ्या घेतल्या. ती त्यांना अधिक बिलगूं लागली. तेव्हां तुकोबा किंचित् मागें झाले. तें पाहून सुंदरा रुसव्या स्वरांत म्हणाली, “ हें काय बरं, असे दूर कां सरतां ? मी आपल्याला आवडत नाहीं ? ”

“ छे, असं कसं होईल ? तुझ्या कंठांतून निघणारा अतिशय मधुर आणि वैकुंठापर्यंत पोहोंचणारा आलाप ऐकून, पांडुरंग देखील डोलत राहील मग माझी काय कथा ? प्रत्यक्ष रखुमाईमातेसमान असणाऱ्या हे भाग्यवान् स्त्रिये, तुला माझे शतशः दंडवत असोत. ”

तिच्या एकंदर वागण्यावरून तिचा भाव आतां तुकोबांनीं जाणला म्हणून त्यांनीं अप्रत्यक्षपणेंच तिला ती जाणीव दिली. त्यांनीं खरोखरीच तिला साष्टांग नमस्कार घातला. एवढ्यांत जिजाई अंगणांत आली. तुकोबा एका वेश्येला साष्टांग नमस्कार घालताहेत हें पाहून तिला संताप आला. ती तशीच आवेशानें पुढें झाली आणि तुकोबांना वर उठवीत म्हणाली,

“ बाई, बाई, आतां करूं तरी काय ह्या यड्याला ? लोक श्यान घालत्याल कीं या गांवभवानी म्होरं असं गडबडा लोळलासा तर. कायग सटवे, काय म्हणून आलीस माझ्या घराला ? ” तिनें सुंदरालाही चांगलें दटावून विचारिलें.

तुकोबा आश्चर्यानें म्हणाले, “ काय म्हणतेस ? ही वेश्या आहे ? वा वा फार चांगली गोष्ट झाली तर. ”

त्यांना वेडावीत जिजाई म्हणाली, “ फ्यार च्यांगली गोष्ट झ्याली, सुद् बुद्, लाज, सारी काय वाटूनशान भांगवानी प्यालासा काय ? चांगली सोबत

५५
अनुक्रम २९८०६
विभाग ग्रा. वा.
क्रमांक १९६

करूनशान तुला भाईर काढली पायजे, व्हय ग ? पुना माझ्या घरामंदीं पाय तर ठेवून बग ? चल हो चालती हतनं."

जिजाईनें तिचा हात धरला. ती तिला घराच्याबाहेर ओढूं लागली. तुकोबा मध्यें पडले.

"असं दुसऱ्याच्या अंगास झटूं नये. आवले, मी सांगतों तिला समजून. बाई, तुझा रस्ता चुकला बरं ! आम्ही विष्णुदास कधींच असल्या फंदांत पडत नाहीं. तुझं हें अध:पतन पाहून मात्र मला अतिशय वाईट वाटतं. तुझं हें तारुण्य आणि लावण्य चार दिवसांचं आहे. क्षणभंगुर सुखासाठीं त्याची अशी होळी केलीस तर अखेरीस तेंच तुला दु:खाचं होईल. हरिचिंतनांत आणि परमेश्वराला आळवण्यांत तूं आपलं आयुष्य खर्च केलंस तर त्यांतच तुझं कल्याण आहे. '**आपणची तारी आपणची मारी, आपण उद्धरी आपणया ॥**' पांडुरंग तुम्हांला सद्बुद्धि देवो. या बरं बाई."

'रखुमाईमातेसमान असणाऱ्या भाग्यवान् स्त्रिये' म्हणून तुकोबांनीं सुंदराला साष्टांग नमस्कार घातला त्याच वेळीं तिच्या मनांतली पापी विषयबुद्धि गेली होती. तुकोबांची योग्यता तिला आतां पटूं लागली होती आणि त्यांच्या शेवटल्या बोलण्यानें तर तिला आपल्या वागण्याचा चांगलाच पश्चात्ताप झाला. ती एकदम त्यांच्या पायांवर पडली आणि म्हणाली,

"मला क्षमा करा महाराज, दुसऱ्यांच्या चिथावणीमुळें दुष्ट हेतूनें मी आपल्याकडे आलें होतें. पण आपल्या उपदेशानें मला खरी उपरति झाली. आतां मी तुमचे पाय सोडून जाणार नाहीं."

जिजाई खवळून म्हणाली, "तर, तर, केरसुणीनें झाडून काढीन. म्हनं जानार नाहीं. तूं एक आपली लाज गांवच्या येशीला टांगली असशील, पण आमीं न्हाई टांगली."

"तुम्ही काय वाटेल तें करा. मारा, झोडा, पण मी कांहीं इथून हालायची नाहीं." सुंदरानेंही जिजाईला तितक्याच निश्चयानें उत्तर दिलें.

"चांगलं करतीस ग बया!"

"खरंच, मी चांगलं करतें बाई. तुमचं शंभर जन्मांचं पुण्य म्हणून तुम्हांला असले पति मिळाले."

"पुरं, पुरं, मग होकी तूं त्येंची बाईल. म्हंजे समजल शंभर जन्माचं पून का पाप त्यें? बगतायसा काय, आलिय्रा चालून घरांत, लावा लगीन."

"तुम्ही मला खरोखरच आईसारख्या आहांत. मला आतां तुम्ही मोलकरीण समजा. तुमची मी वाटेल ती सेवा करीन, पण हे पाय आतां सोडणार नाहीं."

तिचें तें बोलणें ऐकून जिजाईनें दांत ओठ खांत तिच्या दंडाला धरलें आणि तिला बाहेर ढकललें.

"पाय सोडणार न्हायी म्हनं. अदुगर माज्या घराभाईर हो."

जिजाईनें तिला इतक्या जोरानें दाराबाहेर ढकललें कीं ती खरोखरीच दोन हेलपाटे घेऊन रस्त्यावर पडली. जिजाईनें खाडदिशीं दार लावून घेतलें. सुंदरानें दाराकडे पाहिलें. पडल्यापडल्याच तिनें दाराकडे बघून तुकोबांना नमस्कार केला आणि अगदीं दीन होऊन ती म्हणाली,

"तुकोबा, तुकोबा, आतां तुम्हीच माझा उद्धार करा. तुमच्याच अभंगवाणीनें मी पांडुरंगाला साकडं घालतें,

**जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण। यालागीं चरण अंतरले ॥ १ ॥**
**ओढवलें संचित येणें जन्में पाहातां। आतां पंढरीनाथा कृपा करी ॥२॥**
**पतितपावन ब्रीद साच करी देवा। यालागीं कुढावा करी माझा ॥३॥**
**अपराधी पातकी भ्रष्ट दुराचारी। आहाळलों भारी संवसारे ॥ ४ ॥**
**कामक्रोध आदि कल्पनेच्या त्रासे। तुज न पवे ऐसें झालें देवा ॥५॥**
**हा ना तोसा ठाव झाला पांडुरंगा। नयेचि उपेगा काय करूं? ॥ ६ ॥**
**आपुलिया नांवा धांवणिया यावें। लवकरी यावें तुका म्हणे ॥ ७ ॥**

# ११

सुंदरा वेश्या आहे असें समजतांच " वा: वा: फार चांगली गोष्ट झाली तर ! " असे तुकोबांच्या तोंडून सहज उद्गार निघाले ते सर्वस्वीं अर्थपूर्ण होते.

संसारांत राहूनच संसारांतले दुर्घट मायामोह निश्चयानें जिंकत जिंकत परमोच्च सुखाचें अंतिम ध्येय गांठावयाचें असा त्यांनीं निश्चय केला होता. त्यासाठीं त्यांनीं जो साधनमार्ग ठरवला होता, तो त्यांनीं एका आत्मचरित्रपर अभंगांत सांगितला आहे. त्यांनीं पहिली गोष्ट केली ती देहू गांवांतीलच आपल्या विठ्ठल मंदिराचा जीर्णोद्धार केला. म्हणजे प्रत्यक्ष देहाला कष्ट देऊन देवाची खडतर उपासना करण्यास आरंभ केला. पुढें ग्रंथाध्ययन केलें, एकादशी व्रत घेतलें, आरती धूपारती, नामस्मरण, हरिजागर, पंढरीची वारी करीत करीत अध्यात्म जीवनाचा ते एक एक टप्पा गांठूं लागले. पुढें कीर्तनकारांच्या मागें टाळ धरून त्यांची साथ करूं लागले. साधुसंतांचें आदर-पूर्वक आदरातिथ्य करूं लागले. पुढें स्वत:ही कीर्तन करूं लागले. स्वप्नांत गुरूपदेशही झाला.§ म्हणजे ते आतां पूर्ण सिद्ध झाले होते. सिद्धावस्थेंत

§ तुकारामबुवांनीं आपल्याला मार्गदर्शक गुरु मिळवण्यासाठीं अनेक तीर्थस्थानें धुंडाळलीं. अनेक साधुसंतांच्या भेटी घेतल्या. परंतु त्यांना योग्य गुरु आढळला नाहीं. अखेरीस निराश होऊन ते पंढरीस गेले. तेथें ओतुरास जाण्याबद्दल त्यांना दृष्टान्त झाला. तेथें प्रसिद्ध सत्पुरुष केशव चैतन्य ह्यांची समाधि आहे. ओतुरास जाऊन ते त्यांच्याच घरीं उतरले. तेथें त्यांना गुरूपदेश मिळाला. तो केव्हां व कसा मिळाला हें त्यांनींच सांगितलें आहे. ( पुढील पानावर पाहा. )

त्यांचा अधिकारही वाढला, भक्तवर्गही वाढला आणि सालोमालो किंवा मंबाजीसारख्या ढोंगी विरोधकांचा विरोधही वाढला. ह्या विरोधी लोकांनींच तुकोबांची लोकांत नाचक्की करावी म्हणून सुंदरासारख्या नवयौवनसंपन्न वेश्येला त्यांच्याकडे पाठवलें होतें. पण "पराविया नारी माऊली समान" मानणाऱ्या तुकोबांनीं उलट तिचाच हृदयपालट केला. ती तुकोबांच्या भजनीं लागली. तुकोबांचा द्वेष करणाऱ्यांचा तीही द्वेष करूं लागली. तिनें सालोमालोला स्पष्ट सांगितलें,

"तुकाराममहाराजांची योग्यता फार थोर आहे. तुम्ही सुद्धा त्यांना शरण जाऊन जन्माचं कल्याण करून घ्या."

तुकोबांचें प्रस्थ फारच वाढूं लागलें. विशेषतः काव्य आणि कीर्तन ह्यांनीं त्यांचा लौकिक व भक्तवर्ग झपाट्यानें वाढूं लागला. तेव्हां ह्याला कायमचा आळा घालण्यासाठीं सालोमालोनें एक बिनतोड उपाय काढला. त्या वेळीं रामेश्वर भट वाघोलीकर म्हणून एक प्रसिद्ध दशग्रंथी ब्राह्मण होते. त्या पंचक्रोशींत ते धर्माधिकारी होते. त्यांच्या मार्फत तुकोबांवर बहिष्कार घालावयाचा व त्यांना देहू गांवांतून हाकलून द्यायचें, असा त्यानें डाव रचला.

तुकाराम शूद्र असून तो कीर्तन करतो. ब्राह्मण त्याच्या पायां पडतात. तो कवित्व करतो. त्यांत वेद, शास्त्रें, पुराणें ह्यांतलीं भरमसाट वचनें उच्चारतो म्हणून ह्या धर्मलंड वाण्याचें कवित्व अनधिकृत, धर्मबाह्य ठरवून

---

(मागील पानावरून चालू)

सद्गुरुरायें कृपा मज केली। परी नाहीं घडली सेवा कांहीं॥
सांपडविले वाटे जातां गंगास्नाना। मस्तकीं तो जाणा ठेविला कर॥
भोजना मागती तूप पावशेर। पडिला विसर स्वप्नामाजी॥
कांहीं कळे उपजला अंतराय। म्हणोनिया काय त्वरा जाली॥
राघवचैतन्य केशवचैतन्य। सांगितली खूण माळिकेची।
'बाबाजी' आपुलें सांगितलें नाम। मंत्र दिला "रामकृष्णहरी"॥
माघशुद्ध दशमी पाहुनि गुरुवार। केला अंगीकार तुका म्हणे॥

....५९

नाश करावें आणि त्याला गांवांतून हाकलून द्यावें अशी त्यानें रामेश्वरशास्त्र्यांना विनंती केली.

वैदिक धर्मावर हा खरोखरीच आघात आहे अशा प्रामाणिक समजुतीनें रामेश्वरशास्त्र्यांनीं सालोमालोची ती विनंती मान्यही केली आणि प्रत्यक्ष स्थिति पाहण्यासाठीं ते आपल्या वाघोलीहून देहूला आले.

ते देहू गांवांत आले त्या वेळीं रामप्रहर होता. उद्योगी स्त्रीपुरुष सर्व आन्हिकें आटपून आपापल्या कामाला लागलीं होतीं. कामें करतां करतां तोंडानें ते तुकोबांचेच अभंग म्हणत होते. रामेश्वरशास्त्र्यांना जातां जातां त्यांतले चरण ऐकू येत होते—

**तुका म्हणे तोचि संत । सोसि जगाचे आघात ॥**
**तुका म्हणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ॥**
**तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें । येऱ्या गबाळाचें काम नोहे ॥**
**अहं म्हणे ब्रह्म । नेणें भक्तीचें तें वर्म ॥**
**तुका म्हणे क्षण । नको तयाचें दर्शन ॥**

लोकांच्या मनावर तुकोबांच्या अभंग-वाणीचा एवढा मोठा पगडा बसलेला पाहून रामेश्वरशास्त्र्यांना आश्चर्यच वाटलें. सालोमालोच्या घरीं येण्याबरोबर त्यांनीं त्याला तसें बोलूनही दाखविलें,

“ काय हो सालोमालो, तुकारामाचं प्रस्थ चांगलंच माजलेलं दिसतंय. आतां मी येतां येतां ऐकत होतों, तर जो तो आपला ‘ तुका म्हणे ’ ‘ तुका म्हणे ’ करतोय. ”

“ मीं आपल्याला पूर्वींच ह्याची यथार्थ कल्पना दिली आहे.”

“ कसली यथार्थ कल्पना ? ज्याच्या त्याच्या तोंडीं त्याचे अभंग ऐकू येताहेत. मी तर सगळा दोष तुमच्यावर ठेवणार.”

“ माझ्यावर ? ” सालोमालोनें आश्चर्यचकित होऊन विचारलें.

“ हो हो तुमच्यावर. देहूंतल्या सगळ्या ब्रह्मवृंदावर. इतके दिवस तुम्हीं त्याचे हे चाळे चालूं कसे दिलेत ? ”

" सामान्य जन किती मूर्ख असतो, ह्याची ही एक उत्कृष्ट साक्ष आहे. आतां ह्या अधिकारसंपन्न धर्माधिकाऱ्यांना माझी एवढीच विनंति आहे कीं,

**दंड अन्यायाच्या माथा । देखोनि करावा सर्वथा ॥**
**नये उगें बहुत घाटूं । सोनियांत शिसें आटूं ॥**
**सालो म्हणे धर्मदेवा । दोष कोणाचा तो दावा ॥**

" वाहवा ! वाहवा ! सालोमालो, तुमची वाणी चांगली प्रासादिक आहे. तुम्ही इतके उत्कृष्ट कवि आहांत हें मला माहीत नव्हतं."

रामेश्वरशास्त्र्यांनीं त्या काव्याची प्रामाणिकपणें प्रशंसा केली. ती संधि साधून लागलीच सालोमालो म्हणाला,

"आपल्या मुखांतून ऐकलेल्या प्रशंसेनें मी धन्य झालों. आतां आपणच म्हटलं म्हणून सांगतों. माझ्याच कविता घेऊन तो तुक्या इकडचे शब्द तिकडे करतो आणि भिकाऱ्यासारखा गांवांतून गात फिरतो."

" अस्सं " आपल्याला वाटत असलेलं एक मोठें कोडें सुटल्याच्या आविर्भावानें रामेश्वरशास्त्री म्हणाले, " अस्सं, तरीच त्या वाणींत इतका रसाळपणा वाटतो ! मी येतां येतां ऐकत होतों तों त्यांतली शुद्ध शब्दयोजना, निर्दोष रचना आणि मन प्रसन्न करणारा प्रसाद, हीं ऐकून मला आश्चर्यच वाटलं."

" पण तो स्वतः जे अभंग करतो, त्यांत तो आमच्या वेदांचा अगदीं उलटा आणि वेडावाकडा अर्थ करतो. आमच्या ईश्वरप्रणीत वेदांचा हा धडधडीत अपमान आहे आणि इतकं असून आमचा मूर्ख बहुजनसमाज त्याचा उदो उदो करतो. आमच्या देहूंतल्या ब्राह्मणांनींच त्याला शिरजोर केला आहे. अहो, त्याला साधु म्हणून तेच त्याच्या पायांवर लोळण घेऊं लागले आहेत."

" ब्राह्मण त्याच्या पायां पडतात आणि तो शूद्र पायां पडून घेतो ? वारे ब्राह्मण ! म्हणजे हा भ्रष्टाकार चांगलाच वाढत चालला आहे म्हणायचा."

रामेश्वरशास्त्री रागानें म्हणाले. ती संधि साधून सालोमालोनें आपला डाव साधला. तो म्हणाला,

"म्हणूनच मी सगळ्यांत सोपा उपाय काढला आहे. तुक्यालाच देहू गांवांतून उखडून काढला म्हणजे झालं."

रामेश्वरशास्त्री येणार म्हणून देहू गांवचे पाटील व कांहीं प्रतिष्ठित सालोमालोच्या घरीं जमले होते. त्यांना कोणालाच सालोमालोचें तें म्हणणें आवडलें नाहीं. पाटलांनीं तर त्याला स्पष्टच सांगितलें,

"छे, छे. गांवांतून उखडण्यासारखा तुकोबांनीं काय अन्याय केला हाय? तुकोबा हायती म्हणून गांवाला सोबा हाय."

पाटलांना अधिक बोलूं न देतां सालोमालोनें त्यांना मध्येंच दटावलें, "धार्मिक बाबतींत तुमची लुडबुड नको."

मग आपल्या एका नोकराला उद्देशून सोलोमालो म्हणाला, "अरे, तुकारामाला जाऊन सांग, म्हणावं रामेश्वरशास्त्री वाघोलीकर तुझा इन्साफ करण्यासाठीं आले आहेत. तुला आतांच्या आतां माझ्या घरीं बोलावलं आहे."

तुकोबांना निरोप पोचल्याबरोबर ते आले. रामेश्वरशास्त्र्यांचें दर्शन होतांच त्यांनीं त्यांना नमस्कार केला व पायांवर डोकें ठेवण्यासाठीं ते पुढें झाले. त्याबरोबर तो कर्मठ ब्राह्मण तुकोबांच्या अंगावर कडाडला,

"दूर हो, दूर हो, तुझासारख्या अधर्मी मनुष्याचा दुरून देखील नमस्कार नको मला."

तो अनपेक्षित आरोप ऐकून तुकोबांनीं आश्चर्यानें विचारलें, "मी अधर्मी?"

"हो, हो, अधर्मी. आणि तुझ्यामुळें देहू गांवांतले सारे लोकही अधर्मी झाले आहेत."

"माझ्यामुळें लोक अधर्मी झाले आहेत? खरोखरच माझ्या हातून तसा अपराध होत असेल तर आपण सांगाल ती शिक्षा आनंदानें भोगायला मी तयार आहें. भूदेव, आपला निष्कारण गैरसमज झाला आहे." तुकोबा अगदीं नम्रतेनें म्हणाले.



' . भूदेव, आपला निष्कारण गैरसमज झाला आहे. '

“ गैरसमज ?” रामेश्वरशास्त्री तुकोबावर अधिकच उखडले. “ भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठीं कर्ममार्गाचा उच्छेद करण्याचा तूं चंग बांधला आहेस आणि शरम नाहीं वाटत पुन्हा वर तोंड करून बोलायला ? नाममाहात्म्याचं स्तोम माजविणारा तूं एक महान् पातकी आहेस. ”

तुकोबांनीं अगदीं शांतपणें उत्तर दिलें, “ पांडुरंग, पांडुरंग ! परमेश्वर-प्राप्तीचे हे वेगवेगळे मार्ग आहेत. एक खडतर आहे, तर एक साधा आहे. ईश्वराला शोधण्यासाठीं कठिणतर योग केला पाहिजे किंवा त्याला प्रसन्न करण्यासाठीं पूजाअर्चादि कर्मे केलीं पाहिजेत ही योगकर्माची शिकवण सगळ्यांना सहजसाध्य नाहीं. अगदीं सामान्य आणि व्यावहारिक लोकांसाठीं भक्तिमार्ग आहे. लहान असो, थोर असो ; स्त्री असो, पुरुष असो ; शूद्र असो नाहींतर अंत्यज असो ; सर्वांना सर्व वेळीं पात्रापात्रतेची क्षिति न बाळगतां सहज रीतीनें आचरतां येण्यासारखा हा मार्ग आहे.

**नामसंकीर्तन साधन पै सोपें । जळतिल पापें जन्मांतरिंचीं ॥**
**नलगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥**

आमची भागवतधर्माची एवढीच शिकवण आहे. ”

“ पण त्यामुळें आमच्या वैदिक धर्माची पायमल्ली होते त्याची वाट काय ? ”

“ नाहीं, तसं नाहीं वेदमूर्ति. भागवत धर्म हें वैदिक धर्माचं अतिशय सोज्ज्वळ आणि व्यापक स्वरूप आहे. ईश्वर सर्वव्यापी आहे हेंच सगळ्यांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं सांगितलं आहे. ज्याला तुम्ही निर्विकार, निराकार, ॐकार असं म्हटलं आहे, त्यालाच आम्हीं साकार, सविकार पांडुरंग म्हटलं आहे.

**वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ॥**
**विठोबासि शरण जावें । निजनिष्ठा नाम गावें ॥**
**सकल शास्त्रांचा विचार । अंतिं इतुकाचि निर्धार ॥**
**अठरा पुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ॥ ”**

तो अभंग ऐकल्याबरोबर रामेश्वरशास्त्र्यांच्या पायाची तिडिक मस्तकाला

....६३

गेली. ते तुकोबांच्या अंगावर ओरडून म्हणाले, “ हेंच तें! हेंच तें! असली अभंगवाणी निर्माण करून तूं वेदवाणीचा उपमर्द करतो आहेस. तुझं समर्थन अगदीं कुचकामी आहे. मला आतां तुझं कांहीं एक ऐकून घ्यायचं नाहीं. तूं शूद्र आहेस. वेदवाणीचा उच्चार करून आणि त्याचा भलताच अर्थ सांगून तूं मोठा गुन्हा केला आहेस. म्हणून माझी तुला आज्ञा आहे कीं आजपासून तूं हे अभंग वगैरे कोणतंही कवित्व करून लोकांना उपदेश करतां कामा नये. ”

रामेश्वरश्यास्त्र्यांच्या त्याही अवताराला तुकोबांनीं पहिल्या सारख्याच शांत व गंभीर स्वरांत उत्तर दिलें,

“ आतांपर्यंत पांडुरंगच माझ्या तोंडून हे वेडेवाकडे शब्द बोलवीत होता. आपण धर्माधिकारी ब्राह्मण! आपणही मला साक्षात् परमेश्वरच आहांत. तेव्हां आपली आज्ञा म्हणून ह्यापुढें मी कविता करणार नाहीं. ”

“ आणि आतांपर्यंत केलेली कविता? ”

सालोमालोनें रामेश्वरशास्त्र्यांना सूचना दिली आणि ती त्यांनीं लागलीच घेतलीही. ते पुढें म्हणाले,

“ हो. तीही नाहींशी कर. इंद्रायणीच्या डोहांत बुडवून टाक. ”

“ आपली आज्ञा मान्य आहे. ” तुकोबांनीं आज्ञा मान्य केली.

सालोमालोचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. तो पुढें म्हणाला,

“ नुसती मान्य आहे नाहीं, ताबडतोब अंमलांत आण. ”

“ ज्या पापी हातांनीं तूं ते अभंग लिहिले आहेस त्याच हातांनीं तूं स्वतः ते बुडविले पाहिजेस हीच शिक्षा तुला योग्य आहे. ” रामेश्वरशास्त्री पुन्हा तुकोबाला उद्देशून म्हणाले.

“ योग्य – योग्य – अगदीं योग्य शिक्षा ” सालोमालो हर्षभरित होऊन बोलत होता. “ थांब, इथेंच थांब. मी तुला तुझे अभंग इथेंच आणून देतों. म्हणजे वेदशास्त्रसंपन्न धर्मगुरु रामेश्वरशास्त्र्यांच्या देखत शिक्षा घेतल्याचं श्रेय तुला मिळेल. ”

सालोमालोकडे बघून तुकोबा नुसते हसले. पण त्यांच्या त्या हसण्याचा गूढ अर्थ सालोमालोला समजला नाहीं. त्याचा त्यानें विचारही केला नाहीं. तुकोबांना तेथेंच थांबण्यास सांगून सालोमालो अभंग आणण्यासाठीं त्यांच्या घरीं गेला. काशी आणि महाद्या दारांतच खेळत होतीं. विजयाच्या गुर्मींत सालोमालो त्या मुलांना म्हणाला,

" ए पोरट्यांनो, काढा तुमच्या बापानें केलेल्या अभंगांच्या वह्या. "

महाद्याही कांहीं कमी नव्हता. त्यानें सालोमालोकडे एकदा पाहिलें आणि तोही जशास तसें ह्या न्यायानें गुर्मीनेंच म्हणाला,

" अरे ए लाबतोंड्या, तुजा बा आला पायजे त्या न्याया. "

त्या चिमुरड्यानें केलेला अपमान सालोमालोला सहन झाला नाहीं. " मला तूं कोण समजतोस रे, मुस्कट फोडून टाकीन उलट उत्तर दिलंस तर. "

" काय झालं रे म्हाद्या, कुणाबरोबर कां उगाच तंडाया लागलायास ? " ही तंडातंडी ऐकून जिजाई बाहेर येत म्हणाली.

" मी उगाच तंडाया न्हई लागलों आई. ह्यानें माझा बा काढला, मीबी ह्येचा बा काढला. " महादेवानें सरळ उत्तर दिलें.

" लई ब्येस केलंस बग म्हाद्या ! सोबतोस माजा मुलगा. कां र बामना, कां आलायास हतं ? तेंच्या घरांतलीं मानसंबी मांजरावानी झालीं असं तुला वाटलं व्हय ? अगुदर माज्या घरामंदी कां आलास तें बोल ? "

जिजाईचा तो अवतार बघून सालोमालो बराच नरमला. तो सरळ सांगू लागला,

" रामेश्वरशास्त्र्यांनीं तुकारामाला त्याच्या अभंगांच्या वह्या पाण्यांत बुडवायची शिक्षा दिली आहे, म्हणून मी त्या मागायला आलों आहें. "

" चल, चल....व्हया मागायला आलाय मोट्ठं तोंड करून ! "

जिजाईनें सालोमालोला चांगलाच धुडकावला. तेव्हां सालोमालो पुन्हा म्हणाला, " अग बाई, ती रामेश्वरशास्त्र्यांची आज्ञा आहे. "

....६५

" पाटीभर श्यान खातुया तुझा तो रामशास्त्री का रावनशास्त्री. त्यांडांतली वाफ दवडाया त्येच्या बाचं काय जातंय? चल चालता हो माज्या घरातनं."

एवढ्यांत तुकोबा आले म्हणून ठीक झालें. नाहींतर जिजाईनें सालोमालोला कुत्र्यासारखा ओढून काढला असता. सालोमालोला उद्देशून बोललेलें जिजाईचें शेवटचें वाक्य तुकोबांनीं ऐकलें. त्यावर ते जिजाईलाच म्हणाले, " हें काय आवले? असं काय त्यांना वेड्यासारखं बोलतेस?"

" पुना आनि मीच यडी व्हय? अव ह्यो तुमचं हबंग मागतुया नदींत बुडवाया. अन् त्ये मी त्येला देऊं व्हय?"

" अग आवले, ती धर्माधिकारी रामेश्वरशास्त्र्यांची आज्ञा आहे. आम्हांला ती पाळलीच पाहिजे."

असें म्हणत अधिक न बोलतां तुकोबा अभंगांच्या वह्या आणण्यास घरांत गेले देखील. त्यांना अडवण्याचें जिजाईला धैर्य नव्हतें पण तिच्या अंगाचा संताप झाल्याशिवाय राहिला नाहीं. तो तिच्या मुखांतून बाहेर पडूं लागला,

" अवो आतां काय म्हनूं? तुमचं डोस्कं बिस्कं फिरलया का काय? बायकापोरांस्नी आट आट दिस उपाशी ठेऊनशान आनि रातीच्या राती जागुनशान रचल्यालं हे हबंग पाण्यांत टाकूनश्यान देनार, मग इक्तं केलंत तरी कशापायीं? आतां ह्या यड्याला करूं तरी काय? स्वतंपत्रं बुडवूनशान साऱ्या संसाराचा इस्कोट केलासा आन आतां हबंग बुडवूनशान परमार्थाचाबी इस्कोट करतायसा!"

# १२

अभंग बुडवतांना, म्हणजे परमार्थाचा विध्वंस करतांना तुकोबांना तरी काय कमी दुःख होत होतें? पण करणार काय! रामेश्वरशास्त्र्यांसारख्या धर्माधिकाऱ्याची ती आज्ञा होती. ती पाळणें भागच होतें. संकटाच्या कित्येक प्रसंगीं त्यांनीं पांडुरंगाचा धावा केला होता पण आज तोही करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें त्यांना वाटलें. दुःखाच्या उद्वेगानें ते म्हणाले,

" पांडुरंग, पांडुरंग! आतां तुझ्या नांवानें टाहो फोडण्यांत तरी काय अर्थ? भक्तवत्सल ह्या तुझ्या ब्रीदाला तूंच काळोखी फासलीस. तुझ्यासाठीं मी स्वतःच माझ्या हातांनीं माझ्या संसाराला आग लावली. अहोरात्र तुझं चिंतन केलं. बायकापोरांचे तळतळाट घेतले. ह्या सगळ्याचं तूं मला हें फळ दिलंस? इच्छा तुझी! तूं सर्वसत्ताधीश आहेस. माझ्या मुखांतून निघालेलं तुझं गुणवर्णन तुला आवडत नाहीं आणि त्याच्याशिवाय मला दुसरं कांहीं येत नाहीं. मग मी तुझी भक्ति तरी कशी करूं? आतां तूंच काय तो सोक्ष मोक्ष कर. भाविकपणानें केलेल्या तुझ्या भक्तीचा हा डोंगर तुझ्याच पायांवर ठेवतों आणि मीही आतां निर्वाणच मांडतों. इथेंच तुझ्याजवळ माझा देह सांडूं दे. पांडुरंग, पांडुरंग, तुला आपल्या ब्रीदाची लाज राखायची असली तर तुला प्रत्यक्ष प्रकट व्हायला पाहिजे. माझं कवित्व तूं सुरक्षित राखलं पाहिजेस. तुला असं अधिकारानें सांगण्याचा, तुझ्याजवळ असा हट्ट घ्यायचा किंवा त्रागा करून तुला तसं करायला भाग पाडायाचा मला हक्क आहे. कारण मी तुझा दास आहें. आहें कीं नाहीं हें आतां तूं सांग.

**" सांगा दास नोहें तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनी ।।१।।**
**कोणासाठीं केली प्रपंचाची होळी। या पायांवेगळी माय-बापा ।।२।।**
**नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ।। ३ ।।**
**तुका म्हणे आम्हा आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं दुजें कांहीं ।।४।। "**

आणि त्या वेळेपासून पांडुरंगाला अनेक प्रकारें जाब विचारीत, अनेक प्रकारांनीं त्याला विनवीत तर अनेक प्रकारांनीं त्याच्याशीं भांडत तुकोबांनीं तेथेंच निर्वाण मांडलें. त्यांनीं अन्नपाणी अजिबात वर्ज्य केलें. त्यांनीं नुसता नामघोष चालवला.

असे तेरा दिवस गेले. देव तुकोबांची परीक्षाच पाहात होता कीं काय कोण जाणे. अखेरीस ते त्याच्या परीक्षेला उतरले. चौदाव्या दिवशीं पांडुरंगानें बाळवेष घेऊन तुकोबांना प्रत्यक्ष दर्शन दिलें. त्यांना मिठी मारली. त्यांचें पूर्ण समाधान केलें आणि सांगितलें,

" आतांपर्यंत मीं स्वत: पाण्यांत उभा राहून तुझं सगळं कवित्व सुरक्षित ठेवलं आहे. "

इतकें सांगून पांडुरंग अंतर्धान पावले. तुकोबा डोळे उघडून पाहातात तों काय? आपल्या अभंगांच्या सगळया वह्या खरोखरीच पाण्यावर अलगद तरंगताहेत असें त्यांना दिसलें.

ह्या वेळेपर्यंत ही बातमी गांवांत समजली होती. तेव्हां तो चमत्कार पाहाण्यासाठीं सगळा गांव तेथें लोटला होता. सगळ्यांनीं ' रामकृष्ण हरी ' चा गजर करून त्या वह्या बाहेर काढल्या. त्या पालखींत ठेवल्या व विठ्ठल-नामाचा गजर करीत मिरवीत मिरवीत त्या देहू गांवांत नेल्या. अभंग ठेवलेली पालखी उचलून ते दहावीस पावलें जातात न जातात तों रामेश्वरशास्त्री ओरडतच त्या गर्दींत घुसले,

" आग-आग-अंगाचा भडका उडाला-कुठें आहेत तुकाराम बुवा—मला त्यांच्या पायांवर घाला. तुकोबा, मी तुम्हांला शरण आलों आहें. वांचवा-वांचवा



' ... पांडुरंगा, तुझ्या भक्तीचा हा डोंगर तुझ्याच पायांवर ठेवतों. '



देव तुकोबांची परीक्षाच पाहात होता ...

हो मला. छे छे, अंगाचा नुसता डोंब, अगदीं डोंब उडाला आहे. " §

रामेश्वरशास्त्र्यांचा तो दीन हंबरडा ऐकून तुकोबा त्यांच्याजवळ गेले. त्यांनी त्यांच्या अंगावरून मायेचा हात फिरवला. त्याबरोबर शास्त्रीबुवांच्या अंगाची आग एकदम शांत झाली. शास्त्रीबुवा तुकोबांकडे दीन मुद्रेनें पाहात म्हणाले,

"तुकोबा, क्षमा करा मला. मीं तुमची खरी योग्यता ओळखली नाहीं. मीं तुमचा मोठा अपराध केला आहे. पण 'माझी मज आली रोकडी प्रचीत। होऊनी फजीत दुःख पावे ॥' तुम्हीं मात्र थोर मनानें माझी व्याधि दूर केली."

"मीं कांहीं केलं नाहीं शास्त्रीबुवा" तुकोबा निरहंकार बुद्धीनें म्हणाले.

**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती। व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥**
**विष तें अमृत आघात तें हित। अकर्तव्य नीत होय त्यासी ॥**
**दुःख तें देईल सर्व सुख फळ। होतील शीतळ अग्निज्वाळ ॥**
**आवडेल जीवा जीवाचिये परी। सकळां अंतरीं एक भाव ॥**
**तुका म्हणे कृपा केली नारायणें। जाणिजेतें येणें अनुभवें ॥**

तुकोबांच्या ह्या सांगण्याचा गूढ पण सरळ अर्थ शास्त्रीबुवांच्या मनावर चांगला बिंबला. एवढा मोठा वेदशास्त्रसंपन्न धर्माधिकारी ब्राह्मण, पण त्या दिवसापासून तो तुकोबांचा शिष्य झाला आणि लोकांना आत्मविश्वासानें सांगूं लागला,

**उंचनीच वर्ण न म्हणावा कोणी। जे का नारायणीं प्रिय झाले।**
**चहूं वर्णांसी हा असे अधिकार। करितां नमस्कार दोष नाहीं ॥**

§ तुकोबांना शिक्षा देऊन रामेश्वरशास्त्री आपल्या गांवी गेले. पण एकाएकीं त्यांच्या अंगाचा दाह होऊं लागला. तो कमी व्हावा म्हणून रामेश्वरशास्त्री आळंदीस ज्ञानेश्वरांची सेवा करण्यास गेले. तेथें त्यांना दृष्टान्त झाला कीं "पांडुरंगभक्त तुकारामाचा तूं द्वेष केलास, त्याचा छळ केलास म्हणून तुला हें दुःख भोगावें लागतें आहे. त्यांना शरण गेल्याशिवाय तुझ्या अंगाचा दाह शांत होणार नाहीं." रामेश्वरशास्त्र्यांचे डोळे उघडले. त्यांना पश्चात्ताप झाला. ते सरळ देहूला तुकोबांना शरण आले.

# १३

आतां मात्र तुकोबांचा आनंद गगनांत मावेना. पांडुरंगानें त्यांना सगुण रूपांत दर्शन दिलें, म्हणजेच आपल्या भक्तीचें आणि तपश्चर्येचें सार्थक झालें असें त्यांना वाटलें. रामेश्वरशास्त्र्यांसारखा वेदशास्त्रसंपन्न कर्मठ ब्राह्मणही पश्चात्ताप पावून तुकोबांचा शिष्य झाला. ह्याचा अर्थ वैदिक धर्मावर भागवत धर्मानें विजय मिळवला. भागवत धर्माची शिकवण लोकांना अधिकारानें शिकवण्याची तुकोबांची आतां निस्संशय योग्यता झाली. आतां त्यांचा व्याप वाढूं लागला, शिष्यगण वाढूं लागला. कीर्तनें करून लोकोपदेशाचें त्यांचें क्षेत्र विस्तृत होऊं लागलें.

गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांच्या कानांवर तुकोबांची ही कीर्ति गेली. तेव्हां त्यांची भेट घेण्याचें त्यांनीं ठरवलें. आपण थोडे दूर राहून महाराजांनीं मोरोपंतांबरोबर तुकोबांसाठीं पालखी व नजराणा पाठवला. नजराणा घेऊन मोरोपंत तुकोबांच्या घरीं आले तेव्हां ते घरीं नव्हते. दारांत महाद्या आणि काशी खेळत होतीं. त्यांना उद्देशून मोरोपंत म्हणाले,

“ बाळांनो, घरीं कुणी नाहीं काय ? ”

“ हाय तर, मी हाय, म्हाद्या हाय. ” काशी म्हणाली.

“ तसं नव्हे, तुझे वडील तुकारामबुवा आहेत का घरीं ? ”

“ बाबा गेलेत बाहेर. ”

“ आणि तुझी आई ? ”

बाहेर मुलांबरोबर कोणीतरी बोलतें आहे, असें दिसतांच जिजाई बाहेर आली.

" मी हायकी ह्या मुलांची आई. काय पायजे तुमास्नी ? "

मोरोपंतांनीं तिला आदरानें नमस्कार केला व म्हटलें,

" आम्हांला तुकाराममहाराजांचं दर्शन घ्यायचं आहे. आम्ही फार लांबून आलों आहोंत. "

जिजाईनें त्यांच्याकडे एकदा न्याहाळून पाहिलें आणि म्हटलें,

" कसली अवदसा आटवलिया तुमास्नी ? तुमी चांगलं शिरीमंत दिसतायसा. मी सांगतों तें ऐका. उगीच त्या यड्याच्या नादाला लागूं नगासा. न्हाइतर माज्यावानी तुमच्याबी घरादाराचा इस्कोट व्हईल. जावा, त्ये आलं न्हाईती तंवरच जावा. "

" हें पाहा, आम्ही शिवाजीमहाराजांकडून तुकाराममहाराजांना नजराणा घेऊन आलों आहों. "

" नजराणा ? " जिजाईनें आश्चर्यानें विचारलें.

मोरोपंतांनीं आपल्या लोकांना हुकूम दिला, " ठेवा रे तो तिथें. " लोकांनीं तो नजराणा जिजाईपुढें ठेवला. त्यांतले जिन्नस पाहून तिला हर्षवायूच व्हायची वेळ आली. ती म्हणाली,

" खरं म्हंतासा ? हें सगळं आमच्यासाठीं ? हें आतां आमचं झालंया ? "

" होय बाई. " मोरोपंतांनीं मान हलवली.

" काशे, अर म्हाद्या, डोळ फुटल्याती व्हय तुमच ? कवांपास्न हीं मानसं हुबीं हायतीं. पटकूर देकीं त्येस्नी बसाया. बसा, बाबांनु बसा.

" अग काशे, करतियास काय तूं ? जा त्येस्नी बोलावून आन जा. कवांपास्न मानसं बसल्यांती. "

" म्हाद्या, काय करतुयास तूं? बाबांस्नी बोलावून आण जा."

काशीनें महाद्यावर आणि महाद्यानें काशीवर ढकललें पण गेलें नाहीं कोणीच. तीं दोघेही त्यांतले कपडे आणि दागिने घालण्यांतच गुंग झालीं होतीं. जिजाईसुद्धा दागिने घालून पाहात होती. मग मुलें तर काय मुलेंच! सजलेल्या काशीमहाद्याकडे पाहात जिजाई म्हणाली,

" माजी प्वारं कशीं राजबिंड्यावानी हायतीं. कुना मेल्याची दृष्ट लागल."

" अग आई, तुला बी कुनाची दृष्ट लागल. आतां तुझं त्वांड कसं छान दिसतया! अक्षी सटवाईच्या मुखड्यावानी!" काशीनेंही आईचें कौतुक केलें.

एवढ्यांत तुकोबा बाहेरून आले. ते दिसतांच मोरोपंत त्यांच्या पायां पडले. आशीर्वाद देऊन त्यांनीं त्यांना कुशल विचारलें.

" पांडुरंग, पांडुरंग. आपण कुठून आलांत?"

" शिवाजीमहाराजांकडून आम्ही आपल्याला नजराणा घेऊन आलों आहोंत."

" नजराणा?" तुकोबांनीं आश्चर्यानें विचारलें.

" तुम्हांला दिकून आंगरखा आनलाया बाबा."

असें म्हणत महाद्यानें एक भरजरी अंगरखा तुकोबांच्या हातांत आणून दिला. त्यांनीं तो घेतला आणि तेथेंच जमिनीवर ठेवला. त्यांचें जिजाईकडे आणि काशीकडे लक्ष गेलें. जिजाईकडे पाहून त्यांनीं असें कांहीं स्मित केलें कीं त्या स्मिताचा अर्थ जिजाईच जाणूं जाणे. तिनें तो जाणला. तिच्या चर्येवरचा आतांपर्यंतचा आनंद आणि उत्साह एकदम मावळला. ती स्तब्ध राहिली. तुकोबा तोंडावर तसेंच स्मित ठेवून हळुहळू जिजाईकडे येत होते. ते जसजसे पुढें येत होते तसतसा तिचा



जिजाईसुद्धां दागिने घालून पाहात होती, मग.मुलं तर काय ...

रागही वाढत होता. पण तुकोबांनीं त्याची पर्वा केली नाहीं. जिजाईनें आपल्या अंगावर घातलेले सगळे दागिने त्यांनीं उतरले आणि मग प्रसन्न मुखानें तिच्याकडे पाहात ते म्हणाले,

"आतां कशी छान दिसतेस!"

"अगदीं लंकची पार्वतीच!" जिजाई चिडून वैतागाच्या सुरांत म्हणाली.

त्यावरही तुकोबांनीं किंचित स्मित करून अगदीं शांतपणें म्हटलें, "आवले, अग तें विष आहे."

"हं, ईक! असूं द्या! आमी तें खातुया. आमी मस्त शंकराचं बा हाय. कायबी व्होयाचं न्हाई आमास्नी."

"तुम्ही खाल पुष्कळ, पण मी कसा खाऊं देईन? माझी बायको आणि माझीं मुलं असलं विष देऊन मारायचीं नाहींत मला."

तुकोबांना त्या वैतागाच्या भरांत वेडावीत जिजा म्हणाली, "माजी बायको माजीं मुलं! खरं इक देऊन मारा त्येस्नी. माज्या मंगळाईच्या किरपनं घरांत लक्षुमी चालत आली, तिला लाथाडतायसा. काय वाटतंय काय जिवाला? हसतायसा काय? माज्या अंगाची कशी ल्हाई ल्हाई व्हतीया. कुठल्या पुन्याईनं दाल्ला झालासा."

असें म्हणत काशी-महादेवाला घेऊन ती तेथून निघूनच गेली. मग तुकोबा शिवाजीमहाराजांच्या लोकांना उद्देशून म्हणाले,

"घ्या तें गोळा करून आणि तें परत शिवाजीराजांना नेऊन द्या. त्यांना सांगा, आमचा तुम्हांला आशीर्वाद आहे. आम्ही ह्या मानसन्मानाला लायक नाहीं. एका 'विठ्ठल' सेवेखेरीज आमच्या सर्व आशा नष्ट झाल्या आहेत."

"शिवाजीमहाराजांना आपल्या दर्शनाची फार इच्छा आहे. आपल्याला नेण्यासाठीं आम्हीं पालखीही आणली आहे." मोरोपंत नम्रतेनें म्हणाले.

" आम्ही असे उन्हातान्हांत भटकणारे. रस्त्यावरच्या धुरळ्यानें अंग मलीन झालेलं हें हाडामांसाचं चालतं बोलतं भूत, त्या राजबिंड्यापुढें उभं करून काय करायचं आहे? शिवाजीला तरी आमच्या ह्या अमंगल दर्शनानें कसला लाभ होणार आहे?"

" शिवाजीमहाराजांसारखे थोर राजे, आपल्याला मोठ्या आदरानें बोलावताहेत."

" शिवाजीसारखा राजा आणि कुणाच्याही पायाखालीं चिरडली जाणारी यःकश्चित मुंगी दोन्ही आम्हांला सारखींच. तो थोर आहे, उदार आहे पण मला त्याच्याजवळ येऊन काय मागायचं आहे? मला देण्यासारखं त्याच्याजवळ आहे तरी काय? तेव्हां तिथपर्यंत येण्याचे श्रम घेऊन तेवढं तरी आयुष्य व्यर्थ कां दवडा? आतां आम्हांला कांहीं द्यायची त्याची अगदीं इच्छाच असेल तर म्हणावं एवढंच करा...

**आम्हीं तेणें सुखी। म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ।।**
**तुमचें येर वित्त धन। तें मज मृत्तिकेसमान ।।**
**कंठीं मिरवा तुळसी। व्रत करा एकादशी ।।**
**म्हणतां हरिचे दास। तुका म्हणे मज हे आस ।।"**

तुकोबांच्या निस्पृह आणि निर्लोभ वृत्तीची ख्याति शिवाजीमहाराजांनीं ह्यापूर्वीं पुष्कळ ऐकली होती. पण आज त्यांना प्रत्यक्ष प्रचीति आली. महाराजांचें मन एकदम पालटलें. त्यांना आतां धीर धरवेना. ते एकदम पुढें होऊन तुकोबांच्या पायांवर पडून म्हणाले,

"महाराज, आजपासून मी आपला शिष्य आणि हरीचा दास झालों. आपण माझ्या डोळ्यांत वैराग्याचं अंजन घातलं. नरजन्माच्या सार्थक्याचा मार्ग दाखविलात. मोरोपंत, तुम्ही परत जा. मी येत नाहीं. राज्य तुम्ही संभाळा आणि मातोश्रींना सांगा, म्हणावं तुमच्या शिवबाला आत्मज्ञान झालं. दगडामातीच्या किल्ल्यांत दडून बसलेल्या शत्रूला जिंकण्याऐवजीं

हाडामांसाच्या शरीरांतच दडून बसलेल्या मायामोहादि मनुष्यजन्माच्या खऱ्या शत्रूंचा नाश करण्यांत शिवबा गुंतला आहे."

ह्यावर मोरोपंत कांहीं तरी बोलणार तें ओळखून शिवाजीमहाराजच म्हणाले,

"तुम्हीं आतां कांहीं एक बोलूं नका. सांगितलं तसं करा. जा आतां तुम्ही."

महाराजांच्या ह्या निक्षून सांगण्यापुढें मोरोपंतांना कांहींच बोलतां आलें नाहीं. ते मुकाट्यानें गेले. मग महाराज तुकोबांना म्हणाले,

"संतश्रेष्ठ तुकाराममहाराज, मी आपल्याला शरण आलों आहें. मला आपला शिष्य समजून उपदेश द्यावा."

ह्या अकस्मात घडलेल्या प्रकारानें तुकोबाही किंचित आश्चर्यमूढ झाले. पण त्यावेळीं शिवाजीमहाराजांशीं अधिक बोलणें इष्ट नाहीं असें त्यांनीं ठरवलें. ते त्यांना म्हणाले,

"शिवबा, फार लांबून आला आहेस. थकलेला दिसतोस तूं. तेव्हां संध्याकाळपर्यंत विश्रांति घे. मलाही तुला पुष्कळ सांगायचं आहे. रात्रीं कीर्तनाच्या वेळीं तें सांगेन."

आणि रात्रीं कीर्तनाच्या वेळीं शिवबाला उपदेश करण्यासाठींच तुकोबांनीं कुळधर्मानें प्राप्त होणाऱ्या मनुष्याच्या कर्तव्यावरच निरूपण सुरू केलें.

**"कुळधर्मे ज्ञान कुळधर्मे साधन। कुळधर्मे निधान हातीं चढे ॥ १ ॥**
**कुळधर्म भक्ति कुळधर्म गति। कुळधर्म विश्रांति पाववील ॥ २ ॥**
**कुळधर्मे दया कुळधर्मे उपकार। कुळधर्मे सार साधनांचें ॥ ३ ॥**
**कुळधर्मे महत्त्व कुळधर्मे मान। कुळधर्मे पावन परलोकींचें ॥ ४ ॥**
**तुका म्हणे कुळधर्म दावि तेचि देव। यथाविध भाव जरी होय ॥५॥**

तेव्हां आपापले कुळधर्म पाळणं हें प्रत्येक मनुष्याचं कर्तव्य आहे. एवढंच नव्हे, तर त्याची तपश्चर्या, त्याचा मोक्ष, त्याचं परमात्म पद त्यांतच आहे. शिवबा, तुम्ही क्षत्रिय ! क्षात्र धर्मानुसार शत्रूंशीं लढून तुम्हीं देशाचं आणि धर्माचं रक्षण केलं पाहिजे. तो तुमचा राजधर्म आहे. तो तुम्ही

पाळलात तर जनक-अंबरीषाप्रमाणें इहलोकीं कीर्ति आणि परलोकीं मोक्ष मिळवाल."

"पण महाराज, क्षात्रधर्माच्या मोहाचं जाळं इतकं मोठं आणि इतकं गुंतागुंतीचं आहे कीं त्यांत एकदा अडकलेला मनुष्य प्राणी परमेश्वरप्राप्ति करून घेण्यास कधींच मोकळा होत नाहीं."

"तसं नाहीं राजे, वर्णाश्रमधर्माप्रमाणं प्राप्त झालेलीं कर्तव्यं तुच्छ लेखून, ईश्वरप्राप्तीसाठीं संसाराचा त्याग करण्याची किंवा दुसरा कोणताही खटाटोप करण्याची आवश्यकता नाहीं. राजा असो, शिपाई असो, किंवा तुमचा एखादा सामान्य प्रपंची प्रजाजन असो, धर्मानें नेमून दिलेलीं कर्तव्यं करीत परमेश्वराला आपलासा करून घेण्याचा अगदीं साधा मार्ग म्हणजे ...

**नाम घेतां उठाउठी । होय संसाराची तुटी ।।**
**ऐसा लाभ बांधा गांठीं । विठ्ठल पायीं पडे मिठी ।।**
**नामापरतें साधन नाहीं । जें तूं आणिक करीसी कांहीं ।।**
**हांकारोनी सांगे तुका । नाम घेतां राहो नका ।।**

शिवाजीमहाराजांचें पूर्ण समाधान झालें. त्यांनीं तें स्पष्टपणें बोलून दाखवलें,

"खरं आहे. पटलं मला. महाराज, अज्ञानानें माझ्या हातून मोठी चूक होत होती, पण आपल्या उपदेशानें मला माझ्या खऱ्या कर्तव्याची जाणीव झाली."

एवढ्यांत मोरोपंत घाईनें आले आणि शिवाजीमहाराजांना उद्देशून म्हणाले,

"महाराज, आपण कीर्तनांत दंग असल्याचं पाहून चाकणचा किल्लेदार आपल्याला पकडण्यासाठीं इकडच्याच रोखानें येत आहे. आपण इथून लवकर चलावं."

तें ऐकून तुकोबांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले,

"काय ? शिवबाला पकडण्यासाठीं यवन इकडे येत आहेत ? पांडुरंगा, तुझं कीर्तन चालू असतांना तुझ्या भक्तावर हा प्रसंग यावा ना ?"



‘ महाराज, मी शरण आलों आहें ... ’



‘ महाराज, चाकणचा किल्लेदार आपल्याला पकडण्यासाठीं येत आहे ... ’

**न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडें चित्त दुःखी होतें ॥१॥**
**काय तुम्हीं येथें नसालसें झालें । आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥२॥**
**परचक्र कोठें हरिदासाच्या वासें । न देखिजेत देशें राहतीया ॥३॥**
**तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें झालें ॥४॥**

आणि खरोखरीच यवनांची धाड आली. त्यांनीं देवळाला वेढा घातला. त्यांचा तो गलबला ऐकून तुकोबांनीं पांडुरंगाच्या नांवानें टाहो फोडला "पांडुरंगा, पांडुरंगा, कुठें आहेस तूं?

**प्रल्हादाकारणें नरसिंह झालासि । त्याचिया बोलासि सत्य केलें॥१॥**
**रामकृष्ण गोविंद नारायण हरी । गर्जे राजद्वारीं भक्तराज ॥ २ ॥**
**विठ्ठल माधव मुकुंद केशवा । तेणें दैत्यराव दचकला ॥ ३ ॥**

आणि आतां ह्याच वेळीं तूं कुठें दडून बसला आहेस? तूंच आपल्या भक्तांना असं दूर लोटलंस तर त्यांचं रक्षण तरी कोण करणार? तें कांहीं नाहीं, तूं जरी आम्हांला दूर लोटलंस, तरी आम्ही कांहीं तुला सोडायला तयार नाहीं.

**फुटो हें मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ॥**
**नाशिवंत देह झाला जरी भंग । तरी कीर्तनरंग सोडूं नये॥"**

अशा निश्चयानें तुकोबांनीं विठ्ठलनामाचा असा गजर सुरू केला कीं पांडुरंगाला धावून आल्याशिवाय गत्यंतरच राहिलं नाहीं. किल्लेदाराचें यवन सैन्य कीर्तनाच्या ठिकाणीं घुसलें. पण भक्तांवरचें हें संकट टाळण्यासाठीं पांडुरंगानेंच शिवाजीचीं अनेक रूपें धारण केलीं आणि खरा शिवाजी जीव घेऊन पळून जातो आहे असा यवन सैन्याला भास निर्माण केला. पांडुरंगाच्या मायेला ते फसले आणि पळून गेलेल्या मायावी शिवाजीचा पाठलाग करीत ते निघून गेले. तें पाहून तुकोबा गहिंवरून आले. गद्गद स्वरांत पांडुरंगाला उद्देशून ते म्हणाले,

"पांडुरंगा, पांडुरंगा, भक्तरक्षणाचं आपलं ब्रीद राखलंस. धन्य केलंस मला!"

# १४

तुकारामबुवांची आतां चाळिशी उलटून गेली होती. सतत १०-१२ वर्षे भजन-कीर्तन करून, भागवत धर्माचा डळमळणारा पाया त्यांनीं भक्कम केला आणि मग त्यांना वाटलें आपलें अवतारकार्य संपलें. मग ते पांडुरंगाला वारंवार विनवूं लागले, "**आतां दिसो नये जना। ऐसें करा नारायणा ॥**" आपल्या शिष्यांना आणि आप्तेष्टांनाही ते सांगूं लागले, "आम्हीं आतां लवकरच वैकुंठाला जाणार" आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे शके १५७२ फाल्गुन वद्य २ सोमवारीं देवळांत कीर्तनाला जाण्यापूर्वी त्यांनीं जिजाईलाही सांगितलें,

"आवले, आज मी वैकुंठाला जाणार. तूंही चल माझ्याबरोबर."

तुकोबांनीं वैतागानें पूर्वी असें कित्येकदा म्हटलें होतें तसेंच आजही ते म्हणताहेत असें जिजाईला वाटलें. ती म्हणाली,

"एकदा सोडून संबरदा बोलला असाल हें. वैकुंठाला जानार, वैकुंठाला जानार, असं उगीच बडबडूं तरी नगासा."

"आवले, आज मात्र मी हें खरंच सांगतों. आज मी वैकुंठाला जाणार. तूंही चल माझ्याबरोबर. घरदार, पोरं, गुरं, सगळ्यांची आशा आतां सोडून दे."

"चांगलं सांगतायसा. मीबी तुमच्यासंगं नाचायाला लागलों तर संसाराचा हावळाच व्हईल. मी न्हाइ येनार."

तुकोबा गद्गदून म्हणाले, "आवले, ह्या ऐहिक संसारांत तूं माझा हात धरला आहेस, तो असा मध्येंच सोडूं नको. इथें मीं तुझा पावलोपावलीं

क्रमांक

आधार घेतला. कष्टाचे कांटे तूं मला बोचूं दिले नाहींस. सांसारिक आपत्तींशीं तूंच झगडलीस आणि सर्व आयुष्यभर मला परमार्थ साधूं दिलास. **माझी आवली नसती तर तुकारामाला हा दिवसच दिसला नसता.** पतिनिष्ठ संसारी स्त्रीचें तूं कर्तव्य केलंस. आतां मीं आयुष्यभर केलेल्या परमार्थाचा परमोच्च आनंद उपभोगण्याचा क्षण आला आहे, अशा वेळीं तुला बरोबर नेणं हें माझं कर्तव्य आहे. आवले, चलच तूं. तो आनंद आपण दोघंही भोगूं या. तिथल्या त्या चिरंतन आनंदाची तुला एकदा गोडी लागली म्हणजे इथला आनंद तुला विषासारखा वाटेल."

"तुम्ही म्हनतासा, पन मला न्हाई आनंद व्हनार ततं. ततं काय ह्ये घर हाय, का माजी हीं प्वारं हायतीं? मीच तुमास्नी सांगतों, उगीच वैकुंठ वैकुंठ करूं नगासा. हां समजलों, आतां तुमास्नी भाइर हिंडायची हुकी आलीया जनूं! म्हनून म्हंतायसा व्हय वैकुंठाला जातों, वैकुंठाला जातों. जाताय तर जावा अन् या लवकर परत. मीबी आज खंडोबाला निवद केलाया. तुमी आल्याबगार प्वारं जेवायचीं न्हाइतीं हं."

असें म्हणून जिजाई तेथून निघूनच गेली. तुकोबांनीं पांडुरंगाची प्रार्थना केली,

"पांडुरंगा, हिला सुखी ठेव."

ते घरून निघाले ते इंद्रायणीच्या तीरावर आले. त्या दिवशीं तेथेंच त्यांचें कीर्तन होणार होतें पण तें त्यांचें कीर्तन अखेरचें आहे ही कोणालाही कल्पना नव्हती. नेहमींप्रमाणें कीर्तन करून अखेरीस त्यांनीं श्रोत्यांना सांगितलें,

**"तोंचि भक्ति, तोंचि ज्ञान । एक विठ्ठलाचे जाण ॥**

अशी आज माझी स्थिति झाली आहे. आतां मीं माझाही नाहीं आणि तुमचाही नाहीं. मी आतां विठ्ठलच झालों आहें. आतां ह्या देहानें मी तुम्हांला दिसणार नाहीं. म्हणून तुम्हां सर्वांना माझं अखेरचं एकच सांगणं आहे, **सुखी संसारीं असावें, चित्त परब्रह्मीं ठेवावें** । अखंड नाम हा परब्रह्म गांठण्याचा, माझ्या अनुभवाचा एकच अगदीं सोपा मार्ग आहे. त्यानें ईश्वरा-

वरील श्रद्धा अचल होते, चित्त शुद्ध होतें. स्वैरसंचारी मनाला ईश्वरीप्रेमाखेरीज कशानेंही वेसण घालतां येणार नाहीं. मनाच्या ह्या प्रेममय अवस्थेलाच एकविध भाव म्हणतात. अखंड नामोच्चारानें आपल्या अंतःकरणांत हा एकविध भाव उत्पन्न करून परमेश्वरप्राप्ति करून घेतां येते आणि मग

**मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांची ॥**
**अवघे लाभ होती या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥**

ह्यापेक्षां अधिक सांगण्याची आवश्यकता नाहीं आणि आतां वेळही नाहीं. तो पाहा पांडुरंग माझ्यासाठीं तिष्ठत उभा आहे.

**पैल आले हरी । शंखचक्र शोभे करीं ॥ १ ॥**
**गरुड येतो फडत्कारे । ना भी ना भी म्हणे त्वरें ॥ २ ॥**
**मुकुट कुंडलांच्या दीप्ती । तेजें लोपला गभस्ती ॥ ३ ॥**
**मेघश्याम वर्ण हरी । मूर्ति डोळस साजिरी ॥ ४ ॥**
**चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥ ५ ॥**
**पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥ ६ ॥**
**तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥ ७ ॥**

म्हणतां म्हणतां खरोखरीच अंतरिक्षांतून विमान खालीं उतरलें. तुकोबा त्यांत बसले व ते बसण्याबरोबर विमान आकाशमार्गें वैकुंठाला जाऊं लागलें. तुकोबांनीं सर्वांचा निरोप घेतला.

**“आम्ही जातों आमुच्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥ १ ॥**
**तुमची आमुची हेचि भेटी । येथुनियां जन्म तुटी ॥ २ ॥**
**आतां असो द्यावी दया । तुमच्या लागतसे पायां ॥ ३ ॥**
**येतां निजधामीं कोणी ॥ विठ्ठल विठ्ठल, बोला वाणी ॥ ४ ॥**
**रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥ ५ ॥”**

पुं ड ली क व र दा ह रि वि ठ्ठ ल



तुकोबांनीं सर्वांचा निरोप घेतला.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 2९८०६
विभाग पा.ना.
क्रमांक १९६६
नों. दि. 3-7-61
IRBK-0103247
IRBK-0103247